# प्रकरण १

# मराठी कविता

# प्रकरण १

# मराठी कविता

## प्रस्तावना

'प्रज्ञा लोखंडे' या आधुनिक मराठी कवयित्रींमध्ये विशेष स्थान असलेल्या कवयित्री आहेत. त्यांच्या 'उत्कट जीवघेण्या धगीवर' आणि 'मी मिडऊ पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहांचा चिकित्सक अभ्यास करताना त्यातून स्त्रीवादी जाणीवा, दलित जाणीवा आणि महानगरीय जाणीवा उत्कटपणे प्रकट होतात. त्या अनुषंगाने अभ्यास करताना एकूणच मराठी कवितचे स्वरुप लक्षात घेणे महत्वाचे ठरते. त्यानंतर जो स्त्री काव्यनिर्मितीचा प्रवास सुरु झाला, त्यातील महत्वपूर्ण कवयित्रींच्या साहित्यनिर्मितीचा परामर्श घेणे अनिवार्य ठरते. सुरुवातीचे स्त्री काव्याचे स्वरुप आणि त्यामागील असणाऱ्या प्रेरणांचा विचार करणे गरजेचे आहे.

## अ) मराठी कवितेची आद्य परंपरा

मराठी कवितेला एक दीर्घ व समृध्द अशी परंपरा आहे. मराठी साहित्याचा प्रारंभ काव्याने सुरु झाला. परंतु लिखित स्वरुपात साहित्यनिर्मिती होण्याआधी मराठी साहित्यसंपदा ही मौखिक स्वरुपात अस्तित्वात होती. या परंपरेत महाराष्ट्रातील अनेक सृजनशील स्त्री पुरुषांनी मोलाची भर घातली. जात्यावरील ओव्यांपासून सामुहिक उत्सवांमधून कितीतरी अज्ञात स्त्री पुरुषांनी आपापल्या परीने काव्ये निर्माण करुन गायली. अशा लोकसाहित्याला लिपीची गरज नव्हती. थोडी प्रतिभा, लोकजीवनाचे-समूहजीवनाचे आकर्षण, स्मरण आणि मौख्यिक पुनरावृत्तीचे सातत्य या भांडवलावर मौख्यिक साहित्याची पंरपरा सुरु झाली. तिचा प्रारंभ आणि सर्जक (निर्माता) अज्ञातच राहिला.

लोकगीतनिर्मितीमागील प्रेरणा समूहजीवनात आनंद निर्माण करणे आणि आनंद वाढवणे या असतात. काही लोकगीते श्रमपरिहारासाठी निर्माण केली जात तर काही लोकगीते देवावरील भक्तिभाव व्यक्त करण्यासाठी असत. कौटुंबिक प्रेम व्यक्त करणारी, गाव-शिवावरील प्रेम, शेता भातावरील प्रेम व्यक्त करणारीही लोकगीते आहेत. समूहाने गायची, एकेकट्याने गायची, नृत्यसंगीताच्या तालावर गायची, विवाह बारसे -मंगळागौर सारख्या विधी उत्सवात गायची अशा स्वरुपाची विविध प्रकारची लोकगीतं अनामिक काव्यनिर्मात्यांनी निर्माण केली. आपल्या निर्मितीवर आपल्या नावाची मोहर टाकण्याची प्रथा नव्हती. मात्र मुद्रित संस्कृतीत साहित्य निर्मिती करणाऱ्या साहित्यिकाचे नाव देण्याचा अलिखित दंडक निर्माण झाला. मौख्यिक साहित्य पंरपरा लोकगंगेच्या प्रवाहाबरोबर प्रवाहीत होऊन आपल्यापर्यंत पोहचली. त्यातील निर्माते मात्र अज्ञातच राहिले. अशी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रदान होत आलेली मौख्यिक परंपरा आजही टिकून आहे.

इ.स. सहाव्या सातव्या शतकापासून मराठी भाषा शाब्दिक रुपात लिपीबध्द होताना दिसते. सहाव्या सातव्या शतकातील ताम्रपटांतून मराठी भाषा शब्दरुपाने आढळते. तर अकराव्या शतकातील शिलालेखांतून ती वाक्यरुपाने आढळते. आणि बाराव्या शतकात तर 'विवेकसिंधुच्या' रुपाने ग्रंथबध्द होताना दिसते. यापूर्वीच्या काळातले एकसंध लेखन हे प्रामुख्याने बोधकथा, कहाण्या, पत्रव्यवहार स्वरुपी लेखन अशा अवस्थेत आढळते. पण ज्याकडे वाङ्मय म्हणून पाहता येईल असा केवळ 'विवेकसिंधु' हाच ग्रंथ सर्वप्रथम आढळून येतो. १२ व्या शतकाच्या प्रारंभीच लिहिलेला व तत्वज्ञानपर असलेला हा मराठीतील पहिला ग्रंथ होय. त्यासारखा त्यापूर्वी लिहिलेला

अन्य ग्रंथ मराठीत सापडत नाही. 'विवेकसिंधु' हा मराठीतील आदय पदयग्रंथ ठरला. असे म्हणावे लागते. विवेकसिंधुचा काळ हा संस्कृत भाषेच्या प्राबल्याचा काळ होता. पण संस्कृत भाषा ही मूठभर लोकांचीच मक्तेदारी होती. ती केवळ उच्चभ्रू, उच्चवर्णीयांचीच मिरासदारी होती. त्यामुळे तिच्यात एकवटलेले अनमोल ज्ञान सर्वसामान्य अज्ञानी लोकांपर्यंत पोहचत नव्हते. हे संस्कृतातील ज्ञानाचे भांडार सर्वसामान्यांपर्यंत पोहचवणे ही काळाची गरज होती. आणि हे कार्य स्वभाषेतून म्हणजेच प्राकृत मराठीतून करता येणे शक्य आहे. असे जाणून मुकंदराजांनी संस्कृतातील ज्ञान विवेककसिंधुच्या रुपाने मराठीत आणले. सर्वसामान्य मराठी भाषिकांना ज्ञानदान करण्याच्या प्रेरणेतून विवेकसिंधुची निर्मिती झाली. असा ज्ञानदानाचा प्रघात मुकंदराजांनी मराठीत निर्माण केला. 'विवेकसिंधु' ही त्यांची मराठीतील पहिलीच रचना असल्याने व ती काव्यरुप असल्याने त्यांना 'आदयकवीकीर्ती' म्हटले जाते. तसेच वाङ्मय क्षितीजावरील 'पहाटेचा शुक्रतारा' असे म्हटले जाते.

महाराष्ट्रामध्ये बाराव्या शतकात मराठी भाषेमध्ये अर्थात् लोकभाषेमध्ये वाङ्मयनिर्मिती होऊ लागली. पुढे या लेखन माध्यमातून आध्यात्मिकतेच्या आधारावर महाराष्ट्रात प्रामुख्याने तीन परंपरा निर्माण झाल्या त्या तीनही परंपरांना तीन प्रमुख संप्रदाय म्हणून ओळखले गेले. एक-चक्रधरांचा महानुभाव संप्रदाय, दोन ज्ञानेश्वरादी संतांचा वारकरी किंवा भागवत संप्रदाय आणि तीन- रामदास्वामींचा समर्थ संप्रदाय. या तीनही संप्रदायांनी आपल्या आध्यात्मिक वाटचालीमध्ये स्त्रियांनाही प्रवेश घेऊ दिला. त्यांना मराठी भाषेतून आपले विचार मांडण्याची संधी दिली. कविता करण्याची संधी दिली. त्याकाळी निर्माण झालेले हेच स्त्री-मराठी वाङ्मय आजही प्रसिध्द आहे. त्याचा गुणगौरव-सन्मान आजही होतो आहे.

## महानुभव संप्रदाय :

संत ज्ञानेश्वरांच्या आधी आणि 'आद्यकवीकीर्ती ' मुकंदराजांनंतर महाराष्ट्रात महानुभाव संप्रदाय प्रस्थापित झाला होता. त्याचे मूळ नाव 'परमार्ग ' होते. 'महानुभाव ' असा या संप्रदायाचा उल्लेख प्रथम संत एकनाथांनी केला. हा संप्रदाय जातिनिरपेक्ष विचार मांडणारा व स्त्रियांनाही आध्यात्मसाधनेची संधी देणारा संप्रदाय होता. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात महानुभावीयांची वाङ्मयनिर्मिती ही गद्य आणि पद्य या दोन्ही अंगांनी विशेष समृध्द झाली आहे. या संप्रदायाचे मूळपुरुष श्रीगोविंदप्रभू होत. आणि आदयप्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी होत. या संप्रदायामध्ये या दोघांचेही कार्य महत्वाचे ठरते. हा महानुभाव संप्रदाय द्वैतवादाचा पुरस्कर्ता होता. परंतु

या संप्रदायास स्वामी चक्रधरांच्या निधनानंतर उतरती कळा लागली. या पंथाने आध्यात्मिकतेच्या माध्यमातून महाराष्ट्रात द्वैतवादाचा प्रसार केला असला तरी तो त्यापुढे महाराष्ट्रात रुजू शकला नाही परंतु या संप्रदायाने स्त्रियांना ज्ञानप्राप्त करुन घेण्याची संधी दिली. त्यामुळे या काळातील स्त्रिया काही अंशी जीवनाच्या, संसाराच्या जाचक रहाटगाडयातून स्वतःला मुक्त करुन ईश्वरभक्तीत रममाण होऊ शकल्या.

या पंथामध्ये महदाईसा म्हणजेच महदंबा हया एक महान स्त्री होऊन गेल्या. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात आद्यमराठी कवयित्रीचा मान महदंबा यांच्याकडे जातो. कारण त्याकाळापर्यंतची मराठी स्त्री काव्याची पंरपरा ही मौखिक स्वरुपाची असून त्या कवयित्रींचा नामोल्लेख कुठेही नव्हता. त्यांच्या रचनाही लिखित स्वरुपात अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळे महानुभव संप्रदायातील महदंबा याच मराठीतील पहिल्या ज्ञात स्त्री- कवी आहेत. असे म्हणावे लागते. आपले गुरु श्रीगोविंदप्रभु यांच्या प्रेरणेने त्या गाऊ लागल्या. तेव्हा जे उत्स्फूर्त काव्य निर्माण झाले त्यास 'महदंब्रेचे धवळे ' असे म्हणतात. त्यामुळे साहजिकच धवळयांनाच मराठीतील पहिले स्त्रीनिर्मित काव्य म्हणता येईल. तत्कालीन लग्नसोहळयाचे स्वरुप आणि स्त्रीगीताचे स्वरुप या धवळयांवरुन समजू शकते. तसेच तत्कालीन समाजस्थितीची व स्त्रीजीवनाची जाणीव या काव्यावरुन येऊ शकते. अत्यंत उत्कट, भावपूर्ण आणि चक्रधर स्वामींवरील श्रध्दाभाव व्यक्त करणारे हे काव्य आजही मराठी काव्य अभ्यासकांवर प्रभाव टाकते.

## वारकरी संप्रदायः

वारकरी संप्रदाय संत भानुदासांनी निर्माण केला. सुमारे तेराव्या शतकामध्ये संत शिरोमणी 'संत ज्ञानेश्वरांनी' या संप्रदायाचा पाया रचला. तर या संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर 'संत नामदेवांनी' केला. संत प्रभावळीने या संप्रदायाच्या तत्वविचाराची विपुल साहित्यनिर्मिती केली. अठरा पगड जाती-जमातीचे लोक वारकरी म्हणून या संप्रदायाचे अनुयायी झाले. भगवंत भावभक्तीचा भुकेला असतो तो धर्म-जात-लिंग असे भेद मानत नाही. या तत्वाला अनुसरुन शिंपी, कुंभार, सोनार, मराठा, महार, माळी, न्हावी, मुसलमान इत्यादी जाती-धर्मातुन संतप्रभावळ निर्माण झाली. भागवत धर्माच्या अद्वैत तत्वप्रणालीने महाराष्ट्रातील आध्यात्मिक एकता निर्माण झाली. मराठी भाषेची जपणूक आणि साहित्याचे सृजन या संप्रदायाकडून मोठया प्रमाणावर झाले. तसेच कर्मकांड आणि कनिष्ठ देवदेवतांचे स्तोम यांना फाटा मिळाला. अद्वैत तत्वज्ञानातून जनसामान्यांना आध्यात्मिक आत्मविश्वास देण्याचे महान कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. तेराव्या शतकात

महाराष्ट्रामध्ये देवगिरीस सत्ता असलेल्या राजा रामदेवराव यादवाची कारकीर्द मोठी महत्वपूर्ण होती. आर्थिक सुबत्तेने महाराष्ट्र आतेप्रोत भरलेला होता. सुखचैन, भोगविलासासाठी अनेक भोगासक्त वृत्तीच्या लोकांनी कर्मकांड, यज्ञयाग यांना महत्व दिले. त्यामुळे वैदिक पंडितांनी स्वउदरनिर्वाहासाठी अशा कर्मकांडाचे अवडंबर माजऊन महाराष्ट्रातील जनजीवन धार्मिक व सामाजिक स्तरावर अधःपतीत केल्याचे दिसून येते. जाखाई, जोखाई, मंगळाई, म्हसोबा यांसारख्या कनिष्ठ देवतांची उपासना करताना अधःश्रध्देने समाज बरबटला. महाराष्ट्रातील अशा जनतेला जागे करुन स्वस्थितीचे व उन्नतीचे भान देणे आवश्यक होते. संत ज्ञानेश्वरांनी तत्कालीन समाजस्थितीचे भान ओळखून या समाजाला जागे करण्याचे महान कार्य केले. पढिक पंडितांच्या तावडीतून या समाजाची सुटका करणे अवघड गोष्ट होती. परंतु तरीही ज्ञानेश्वरांनी स्वबळावर फार मोठे समाजमतपरिवर्तन घडऊन आणले. ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीने महाराष्ट्रात अलौकिक असे स्थित्यंतर घडले. सतराव्या शतकात 'संत बहिणाबाई' यांनी रचलेला अभंग

"ज्ञानदेवे रचिला पाया ।
उभारिले देवालया ।"

हा अभंग सार्थच ठरतो.

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या वारकरी संप्रदायामध्ये समाजातील जनसामान्यांना एकत्र आणून

"यारे यारे लहान थोर ।
याति भलते नारी नर।"

असा उद्घोष केला. जनसामान्यांना समजेल, रुचेल अशा प्राकृत मराठी भाषेतून अभंगरचना केली. ठिकठिकाणी लोकांना जमऊन त्याची पारायणे केली. परमेश्वर आणि सामान्यातील सामान्य मानवाचा आत्मा एकरुप आहे असे अद्वैती तत्वज्ञान संत ज्ञानेश्वरांनी लोकांना पटऊन दिले. त्यामुळे अमाप संख्येने वारकरी संप्रदायाचा भवसागर वाढू लागला. श्रीविठ्ठलभक्ती बरोबरच आध्यात्मिक भक्तीमार्गातून जीवनाचे हित साधणे हा महान संदेश संत ज्ञानेश्वरांनी जनसामान्यांपर्यंत पोहचवला. अत्यंत सोप्या, प्रेमळ, रसाळ शब्दांत अभंगरचना केल्यामुळे आज सातशे वर्षे लोटली तरी मराठी मनाला ही अभंगवाणी भुरळ घालते.

वारकरी संप्रदायामध्ये तेराव्या शतकापासून संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, पंधराव्या शतकात संत एकनाथ, सतराव्या शतकात संत तुकाराम यांनी एकूण सुमारे सातशे वर्षे भक्ती संप्रदायाची अजोड वाङ्मयधारा निर्माण केली. तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत या भक्तीसागरात ज्ञानेश्वरांची अभंगकविता एखादया दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरली. तिच्या प्रकाशामध्ये मानवी जीवनाच्या कल्याणाचे दर्शन घडते. संत ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीचेच प्रकाशतेज घेऊन वारकरी संप्रदायातील कवी आणि कवयित्रींची कविता साकार झालेली दिसून येते. अनेक जनसामान्यांची मने या अभंगतेजाने उजळून गेल्याचे दिसते. संत ज्ञानेश्वरांच्या अभंग ज्ञानाच्या प्रकाशाला अनेक शतकानंतरच्या संत तुकारामांच्या अभंगवाणीने विशेष झळाळी प्राप्त झाली. त्यानंतर मात्र हा ज्ञानमयी तेजोप्रकाश अचानक लुप्त झाल्याचे दिसून येते. तरीही वारकरी संप्रदायातील सर्वच लहानमोठया संतकवी, संतकवयित्रींना संत ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीने एकसंध बांधले आहे. संपूर्ण महाराष्ट्र आणि मराठी माणूस ज्ञानेश्वरांनी आणि वारकरी संप्रदायाशी संपूर्ण भक्तीभावाने जोडला गेला आहे. एक आई आपल्या अपत्याचे संगोपन करते. त्याला सुजाणतेच्या मार्गावर आणण्यासाठी जीवनाचे योग्य दर्शन घडवते. त्याप्रमाणेच संत ज्ञानेश्वरांनीही आपल्या आध्यात्मिक तत्वज्ञानातून संपूर्ण मराठी सर्व-सामान्यांचे संगोपन केले. त्यामुळेच संत ज्ञानेश्वरांचा उल्लेख हा 'ज्ञानेश्वर माऊली' असा केला जातो.

महानुभाव संप्रदायामध्ये स्त्रियांचा सहभाग आहे. त्याप्रमाणे किंबहुना त्यापेक्षाही जास्त प्रमाणात ज्ञानेश्वरांच्या वारकरी संप्रदायात स्त्रियांचा सहभाग दिसून येतो. यासंप्रदायामध्ये ज्ञानेश्वरादी भावंडाची बहिण 'संत मुक्ताबाई' तसेच 'संत जनाबाई ', 'संत कान्होपात्रा', 'संत बहिणाबाई' यांनी मराठी काव्यपरंपरेत मोलाचे कार्य केले. श्रीविठ्ठलभक्ती बरोबरच स्त्री दु:ख, तत्कालीन समाजस्थितीचे वर्णनही त्यांनी आपल्या ओवी-अभंगातून घडवले आहे.

प्राचीन काळापासून, वेदकाळापासून स्त्रीचे संपूर्ण जीवन बंदिस्त झाले आहे. आध्यात्मिक किंवा पारमार्थिक गोष्टींमध्ये ती एक 'पापयोनी' ठरली.

"नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्यूपोषितम।

पतिः शुश्रुष्यते येन तेन स्वर्गे महियते।।"

आपल्या प्राचीन धर्मग्रथांत पतीची सेवा करणे हाच स्त्रीधर्म आणि त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या स्मृती जपणे यातच स्त्रीचा पारमार्थिक मार्ग असल्याचे सांगितले आहे. अगदी

गीतेतसुध्दा स्त्रिया, वैश्य, शूद्र आणि अत्यंज यांना पापयोनीतील मानले आहे. या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वरांनी स्त्री, शूद्र आणि उपेक्षितांना कुठलीही बंधने न देता आत्मोध्दाराचा मार्ग सांगितला आहे. ज्ञानेश्वर मानतात की अंतःकरण शुध्द असेल तर सर्वच साध्य होते. अनादी काळापासून स्त्रीला दासी बनऊन तिचे सारे व्यक्तिमत्व दडपून टाकले होते. सती जाणे, केशवपन, सार्वजनिक ठिकाणी वावरण्यास मज्जाव, तिच्या अभिव्यक्तीकडे दुर्लक्ष असे स्त्रियांसाठीचे कडक नियम वैदिक ग्रंथांनी समाजात प्रस्थापित केले होते. संसाराचे रहाटगाडे ओढणारी पतीची आज्ञा मानणारी आणि मुले जन्माला घालणारी अशी ही स्त्री एक यंत्र बनली होती. या पार्श्वभूमीवर संतसाहित्याने महत्वाची कामगिरी बजावली. विविध कर्मकांडांमध्ये समाज अधिकाधिक गुरफटला गेला असताना स्त्रीला हीनपणाची वागणूक मिळत असताना संतसाहित्याने तिला मानाने जगण्याचा मार्ग दाखऊन तत्कालीन समाजात मोठे परिवर्तन घडऊन आणले. यात कुणाही एकाच जाती धर्माच्या स्त्रियांनाच सामाऊन न घेता समाजातील सर्वच थरांतील स्त्रिया संत संप्रदायात समाविष्ट झालेल्या दिसतात. साहित्यनिर्मितीमध्ये या संप्रदायातील स्त्रियांचा सहभाग मोठा आहे. भक्तीसंप्रदायातील या स्त्री संतांचा आढावा घेताना प्रा. शारदा देशपांडे म्हणतात,"भक्तिसंप्रदायातील स्त्री संतांच्याकडे एक साधा दृष्टिक्षेप टाकला तरी ही गोष्ट लक्षात येण्यासारखी आहे. मीरा राजस्त्री होती, तर जनाबाई दासी होती. संत सखू कुलस्त्री होती तर मुक्ताबाई कुमारी होती. वेणाबाई विधवा होती तर अक्काबाई अहेवपणीच देवाच्या भजनात रंगून गेली. कान्होपात्रा गणिका असूनही देवाच्या चरणी देह अर्पण करुन अमर बनली. राजाई, गोणाई शिंपी समाजातल्या होत्या. चोख्याची पत्नी महारीण होती तर वेणाबाई, बहिणाबाई ब्राम्हण होत्या. याचा अर्थ संतांचा संदेश सर्वांसाठी होता"[१]

संतसाहित्य हे फक्त भक्तीरस निर्माण करणारे साहित्य नसून ते लोकप्रबोधन, लोकजागृती आणि लोकचळवळ उभारणारे साहित्य आहे. एक प्रभावी माध्यम आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास. या प्रमुख संतांप्रमाणेच सेना न्हावी, बंका महार, गोरा कुंभार, विसोबा खेचर, चोखामेळा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई अशा अनेक संतांनी संतसाहित्य समृध्द करत आपल्या ओघवत्या शैलीतून केलेले लेखन समाजातील सर्वच जनसामान्यांपर्यंत हे साहित्य पोहचऊन त्यांचा उत्कर्ष साधण्याचा मुख्य हेतू पूर्ण केला. त्यायोगे आज सातशे वर्ष संत साहित्यातील गोडवा कमी झालेला दिसत नाही. एक अक्षरही न शिकलेल्या व्यक्तीला या संप्रदायातील अभंग, ओव्या, भारुडे मुखोद्गत असतात. आजही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडींवर संतसाहित्याचा प्रभाव

विलक्षण दिसून येतो. आजही जगताना योग्य मार्गदर्शनासाठी संत साहित्याचीच मदत घ्यावी लागते. यातून संतसाहित्याचा प्रभाव आणि महत्त्व दिसून येते.

संत साहित्याचा अभ्यास करताना तत्कालीन सामाजिक परिस्थिती पाहता स्त्रियांचे संतपण किंवा त्यांनी केलेली साहित्य निर्मिती यांना ऐतिहासिक महत्व आहे. या साहित्यनिर्मितीत स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणावर नसला तरी बाराव्या शतकाच्या शेवटी महदंबा आणि तिथंपासून सोळाव्या शतकातील समर्थ रामदासांच्या शिष्या वेणाबाई यांच्यापर्यंत काही महत्वाच्या संतकवयित्रींमध्ये प्रामुख्याने मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई यांचा उल्लेख महत्वपूर्ण ठरतो. या कवयित्रींनी स्वतंत्रपणे रचना केल्या परंतु तत्कालीन संतमंडळावरही त्याचा मोठा प्रभाव पडला. डॉ. उषा देशमुख आपल्या 'संतसाहित्य दर्शन' या पुस्तकातील एका लेखामध्ये म्हणतात,"जनाबाईने नामदेवांच्या चाळीस माणसांचे संसारचित्र उभे केले. मुक्ताबाईने ज्ञानदेवांना आणि चांगदेवांना उपदेश केला. सोयराबाईने गोरोबाचे चरित्र लिहिले. वेणाबाईने रामदासांविषयी लिहिले.बहिणाबाईने तर संतपरंपरेची इमारतच उभी केली. अशा पध्दतीने संत कवितेत स्त्रियांचा वाटा फार मोठा आहे हे विसरुन चालणार नाही."[२] तसेच उषा देशमुख पुढे असेही म्हणतात. " 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' आणि 'योगी पावन मनाचा अपराध साहे जनांचा' मुक्ताबाईने म्हटले नसते तर ज्ञानदेवांनी साहित्यनिर्मिती केली असती किंवा नाही याविषयी शंका वाटते. महदंबेने म्हाईंभटास प्रश्न विचारले नसते तर चक्रधरांचा 'एकांक' निर्माण झाला नसता. नामदेवांची आई आणि बायको देवाशी भांडल्या नसत्या तर नामदेवाची भावभक्ती प्रखर झाली नसती." [३] म्हणून संतसाहित्याच्या वाङ्मयनिर्मितीत स्त्री कवयित्रींचे योगदान मोलाचे व महत्वपूर्ण आहे.

## समर्थ रामदासः

महाराष्ट्रामध्ये समर्थ रामदास स्वामींच्या समर्थ संप्रदायाचे महत्व अनन्यसाधारण आहे. सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात मुसलमानी राजवटीने धुमाकूळ घातला होता. तत्कालीन सामाजिक, राजकीय आणि धार्मिक जीवन पार बिघडून गेले होते. समर्थ रामदास स्वामींनी श्रीराम भक्ती आणि उपासनेच्या माध्यमातून समाजामध्ये वैदिक वर्णाश्रमधर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्थापन केलेल्या संप्रदायाला समर्थ संप्रदाय, रामदासी संप्रदाय तसेच दाससंप्रदाय असेही म्हणतात. श्रीराम हे रामदासस्वामींचे गुरु आणि हनुमंत हे प्रेरणास्थान होते. समर्थांनी म्हटले आहे.

"साहय आम्हांसी हनुमंत ।

आराध्य दैवत श्रीरघुनाथ ।"

तसे पाहता समर्थ संप्रदाय हा वारकरी संप्रदायाहून भिन्न स्वरुपाचा नाही. ईश्वरभक्ती हेच या दोन्हीं संप्रदायांचे पहिले उद्दिष्टय आहे. समर्थ रामदासांनी श्रीराम आणि हनुमान यांच्या भक्ती उपासनेला आपल्या संप्रदायात महत्वाचे स्थान दिले. हनुमान हे श्रेष्ठ बलाचे प्रतीक आहे. म्हणूनच त्याला देवस्थानी मानून तत्कालीन समाजातील आळस, नाकर्तेपणा दूर सारण्यासाठी बलोपासना महत्वाची मानली आहे.

"आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना।

उपासका सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षचि पावणे ।"

असा या संप्रदायाचा आचारधर्म आहे. समर्थ रामदास हे जन्मभर महाराष्ट्रातील लोकांसाठी त्यांची उन्नती करण्यासाठीच कार्यरत राहिले. रामदासांनी आचारधर्म आणि विचारधर्मात थोडा फरक असलेला संप्रदाय स्थापन केला असला तरी लोकशिक्षण आणि लोकजागृती ही मुख्य तत्वे वारकरी संप्रदायातूनच आलेली होती. समर्थपूर्वकालीन संतांनी जातीभेदांना नष्ट करण्याचा महत्वपूर्ण प्रयत्न केला तेच त्यांच्या जिवित कार्याचे ध्येय होते. परंतु समर्थांची विचारधारा ही ब्राम्हणशाहीचा पुरस्कार करणारी होती. वर्णव्यवस्थेचा पूर्ण बिमोड करण्याचा प्रयत्न त्यांनी केला नसला तरी समाजातील सर्व स्तरातील, सर्व जातीतील लोकांमध्ये सुधारणा व्हावी, नैतिकता वाढावी असा प्रयत्न समर्थांनी केलेला आहे. समर्थ रामदास हे इतिहास तत्वनिरुपण करणारे महाराष्ट्रातील प्रथम ग्रंथकार आहेत. वारकरी संप्रदायातील संतांनी महाराष्ट्राचे कल्याण करताना राष्ट्रिय व सामाजिक दिशेने विचार फारसा केला नाही. हा फरक रामदासस्वामी आणि इतर संतांमध्ये होता. रामदासस्वामी हे सर्वदेशी होते. निवृत्ती मार्गाकडे झुकुन त्याला अपरिहार्य मानणाऱ्या अद्वैत तत्वज्ञानाला रामदासांनी ऐहिक बांधिलकीची जोड दिली. बारा वर्षांची अखंड भ्रमंती केली. तेव्हा भारतीय समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर अनेक मठ उभारुन निःस्पृह शिष्यांची संघटना उभारली.

'मनाचे श्लोक' हा महाराष्ट्राच्या विचार जडणघडणीचा महत्वाचा पाया मानला जातो. समर्थांनी लोकांमधील आळस झटकण्याचे बेशिस्तपणा संपवण्याचे उपदेश करुन आपले कर्तृत्व संपन्न करण्याचा बोध दिला. परमार्थाबरोबर बलप्रतिष्ठा आणि

राजकीय भान देणारा हा 'एकमेव' संप्रदाय म्हणूनही समर्थ संप्रदायाचे महत्व आहे. महाराष्ट्रात अकरा मारुतींची प्रतिस्थापना करुन युवावर्गाला बलप्रतिष्ठेचा मार्ग समर्थांनी दाखविला.

"मराठा तितुका मेळवावा।

महाराष्ट्र धर्म वाढवावा ।। "

अशा प्रकारच्या काव्यरचनेतून महाराष्ट्रीयांची एकता निर्माण करण्याचा व वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

आपल्या संप्रदायात त्यांनी स्त्रियांनाही प्रवेश दिला. संत वेणाबाई या उल्लेखनीय संतकवयित्री समर्थ संप्रदायातील आहेत. तसेच बयाबाईंनीहि श्रीरामभक्ती विषयी काही रचना केल्या. समर्थ रामदासांनी प्रथम कुठलीही गोष्ट स्वतः आचरणात आणून मग लोकमानसावर ती बिंबवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातीलच नव्हे भारतातील आध्यात्मिक, धार्मिक क्षेत्रात समर्थ संप्रदाय एक महत्वाचा संप्रदाय म्हणून त्याची कामगिरी अजोड आहे.

## निष्कर्ष:

१. मराठी वाङ्मय हे लिखित स्वरुपात अस्तित्वात येण्याआधी ते मौख्यिक स्वरुपातच होत. त्याचे स्वरुप काव्यात्मक पध्दतीचेच अधिक होते.

२. मुकंदराजांनी सर्वप्रथम मराठी भाषेत ग्रंथनिर्मिती केली. त्यांचा 'विवेकसिंधु' हा ग्रंथ तत्वज्ञानावर आधारित आहे.

३. महानुभव आणि वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला अतुलनीय अशी साहित्यसंपदा प्रदान केली. आपल्या रचनांमधून जनसामान्यांचा पारमार्थिक उत्कर्ष साधण्याचा प्रयत्न केला.

४. या संत साहित्यामध्येच स्त्री काव्याचा उगम झाला आहे. यातील संतकवयित्रींना आपल्या रचनांनी मराठी वाङ्मयानिर्मितीत मोलाची भर घातली आहे.

## ब) मराठी कवयित्रींची पूर्व परंपरा

मराठी कवितेची आदय परंपरा समृध्द स्वरुपाची आहे. बाराव्या शतकापासून सुरु झालेल्या वाङ्मयनिर्मितीतून प्रेरणा घेऊन अनेक सृजनशील स्त्रियांनीही या वाङ्मयनिर्मितीत अलौकिक योगदान देत मराठी भाषा अधिकाधिक समृध्द केली. महाराष्ट्रात काव्याची मौख्यिक परंपरा जेव्हा अस्तित्वात होती तेव्हा त्याची मक्तेदारी बहुतेक करुन स्त्रियांकडेच होती. जात्यावरच्या ओव्या, विवाहादी सोहळयातील गाणी, देवघरातील अभंग, हादग्याची गाणी या सर्वांशी स्त्रियांच निगडीत होत्या.

संतसाहित्यातही अनेक कवयित्रींनी आपल्या अभिव्यक्तीतून महत्वपूर्ण रचना केल्या आहेत. बाराव्या शतकाच्या शेवटी महानुभाव संप्रदायातील 'महदंबा' या मराठीतील पहिल्या ज्ञात स्त्री कवी आहेत. त्यानंतर वारकरी संप्रदायातून संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत बहिणाबाई आणि समर्थ संप्रदायातील संत वेणाबाई इ. कवयित्रींनी मराठी वाङ्मयनिर्मिती केली आहे. मराठी कवितेची आदय परंपरा पाहिल्यानंतर मराठीतील आदयकवयित्रींच्या जीवनकार्याचा व साहित्यनिर्मितीचा परिचय करुन घेणे महत्वाचे ठरते.

* महदंबा:

महदंबा या मराठीतील आदय कवयित्री आहेत. त्यांचे मूळ नाव 'रुपाई' असे होते. परंतु चक्रधरांनी त्यांचे आवडीने 'महदंबा' हे नाव ठेवले होते. बालपणीच विवाह होऊन पुढे लगेचच त्यांना वैधव्य आले. त्यामुळे त्या अत्यंत पतीतासारखे जीवन जगत असतानाच पुढे त्या चक्रधरांच्या सान्निध्यात आल्या. तेव्हा त्यांची निराशजनकता नष्ट होऊन चक्रधरांच्या प्रभावाने प्रेरित झाल्या. व नव्याने जीवन जगण्याची त्यांना उमेद मिळाली. चक्रधरांच्या आज्ञानेच त्या ऋध्दिपूर येथे जाऊन श्रीगोविंदप्रभूंची सेवा करु लागल्या. त्यांच्याच सान्निध्यात त्यांनी धवळयांचा पूर्वार्ध रचला. अत्यंत प्रतिमासंपन्न व 'शीघ्र कवयित्री' म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांच्या जन्माविषयी व मृत्यूविषयी अचूक माहिती मिळत नाही. फक्त त्यांचा शेवट नवगाव (हैद्राबाद) येथे झाल्याची माहिती मिळते. आपले उर्वरीत आयुष्य त्यांनी सत्पुरुषांच्या सेवेत व्यतीत केले. पाककलेत त्या अत्यंत निपूण होत्या. उत्तम रांगोळया काढण्यात त्यांचा हातखंडा होता. महदंबा यांचे गुरुप्रेम म्हणजे एक गुरुभक्तीचा आदर्श नमुना होय. त्या अत्यंत स्पष्ट बोलणाऱ्या, वाचाळ व बडबडया स्त्री होत्या. त्यांची जिज्ञासा खूप प्रबळ होती.

त्यांच्या शिस्तप्रियतेमुळे व विद्वतेमुळे पंथातील लोकांवर त्यांचा वचक होता. चर्चा व वादविवाद करण्यात त्या पटाईत होत्या. म्हणून तर चक्रधरस्वामी "म्हातारी जीज्ञासकः म्हातारी चर्चकःम्हातारी एथ काही पूसतचि असे" असे म्हणून त्यांची गौरवपर स्तुती करायचे. महानुभावपंथातील सत्पुरुष नागदेवाचार्यही कौतुकाने त्यांना " म्हातारी धर्मरक्षकः प्रीतिरक्षकः सुह्रदत्त्वे दुःख-निर्वेदः" असे म्हणून त्यांचा गुणगौरव करायचे. यातून महदंबा यांच्या व्यक्तिमत्वाची नानाविध रुपे स्पष्ट होतात.

'महदंबेचे धवळे' आणि 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर ' या रचना म्हणजे मराठीतील पहिली कथाकाव्ये होत. 'धवळे पूर्वार्ध' आणि 'धवळे उत्तरार्ध' अशा स्वरुपात धवळयांची निर्मिती झाली आहे.

### १. धवळे पूर्वार्धः

धवळे म्हणजे विवाहप्रसंगी गावयाचे वरविषयक गीत होय. अंदाजे शके १२०२ च्या दरम्यान या धवळयांची रचना झाली असावी. एकदा भिक्षा मागण्यासाठी महदंबा निघाल्या असताना वाटेत त्यांना एक बाशिंग घेऊन जाणारी तेलीण भेटली ते पाहून महदंबांनीही बाजारातून एक बाशिंग विकत आणले व गोविंदप्रभूंच्या श्रीमुकुटी बांधले, कांकण घातले, तुरे वाजवले त्यावेळी गोविंदप्रभू म्हणाले, "आवो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणेः तुरया थाट गाय म्हणे" (लीळा क्र. २२४) आणि गोविंदप्रभुच्या आज्ञेवरुन महदंबा गाऊ लागल्या. अत्यंत प्रेमळ अंतःकरणाने महदंबा यांनी कृष्णकथा रचून गीते गायली. आणि पूर्वार्धातल्या धवळयांची निर्मिती झाली. यात एकूण फक्त ८३ धवळे आहेत. गोविंदप्रभूंच्या आज्ञेने झालेली ही प्रासंगिक रचना आहे.

### २. धवळे उत्तरार्धः

महदंबा या शीघ्र कवयित्री असल्याने एकदा म्हाईभट व लक्ष्मींद्रभट यांनी तिला 'रुक्मिणीसैंवर' का न करा? असा प्रश्न विचारला व दोघेही रुक्मिणीस्वयंवर कथा गाण्याचा आग्रह करु लागले. परंतु पूर्वी गोविंदप्रभुंच्या प्रेरणेने उत्फूर्त रचना करता आली. आता 'मज काई करवेल? असे महदंबा म्हणू लागल्या. आणि रचना करण्यास असमर्थता व्यक्त केली. परंतु 'आम्ही शब्द घडवुनि : तुम्ही गा' असे त्या दोघांनी आश्वासन दिल्यामुळे त्यांनी जी स्वयंवर कथा गायली ती या दोघांनी शब्दबध्द केली आहे. म्हणून उत्तरार्धातील धवळयांचे रचना कर्तृत्व महदंबा यांच्यासह म्हाईभट व

लक्ष्मींद्रभट या तिघांकडे जाते. यात एकूण ६३ धवळे आहेत. व त्यांची रचना शके १२३० पूर्वी झालेली असावी.

उत्तरार्धात रुक्मिणी स्वयंवर कथेत श्रीकृष्णाचे सौंदर्यपूर्ण रुप गुण वर्णन हा या धवळयांचा खास विशेष आहे. रुक्मिणीच्या श्रीकृष्ण ओढीचेही अत्यंत जाज्वल्य चित्रण आले आहे.

"सौंदर श्रीकृष्ण देखियला झळकताः
तव तियेचे आकर्षिले चीत
कैसी संभ्रमीत जाली माडी वरुनिया घालू पाहे झेपः"

पुढे श्रीकृष्ण दर्शनाने भाराऊन गेलेल्या रुक्मिणीच्या सख्या पुन्हा सावरुन "तुझा पती आम्हा पिता, दुजा न आठवे विचारु" असा निर्वाळा देतात. महदंबा यांनी स्त्री मनाचे नानाविध अवस्थांचे रागरंग हळूवार रेखाटले आहेत. रुक्मिणी स्वयंवरानंतर श्रीकृष्णांनी रुक्मिणीसह द्वारकेत प्रवेश केला तेव्हा द्वारकावासीयांची झालेली अवस्था, त्यांना झालेला आनंद याचे भावमधूर चित्र महदंबांनी रेखाटले आहे.

या धवळयांतून महदंबा यांची अतिशय ओघवती शैली दिसून येते. अत्यंत सुंदर शब्दात गायलेल्या 'कृष्ण रुक्मिणी' कथेमधून महदंबा यांनी कृष्ण, रुक्मिणी, बलराम आदींची व्यक्तिचित्रे जिवंतपणे उभी केली आहेत. संघर्षाचे चित्रण, नाटयमय प्रसंग, स्त्रीसुलभ भावभावनांचे, मत्सराचे ही दर्शन यातून आले आहे. काही प्रासंगिक विनोदही आले आहेत.

### ३. मातृकी रुक्मिणी स्वयंवरः

महदंबा यांनी रचलेले हे आणखी एक कथाकाव्य आहे. याची रचना मातृकात (अक्षरात) केलेली आहे. यात ११० ओव्या असून १ ते ८२ ओव्यांत 'क' ते 'क्ष' पर्यंत मातृका आहेत. ८३ ते १०१ ओव्यांत 'अ' पासून 'उ' पर्यंत व नंतर भ-ट-च-द-व-म-न-व असा अक्षरक्रम आहे. महदंबा यांनी रुक्मिणीला मातृतुल्य कल्पून तिच्या स्वयंवर सोहळयाचे वर्णन केले आहे. या रचनेत अत्यंत सफाईदारपणा आढळून येतो. याचे कथानकही गतिमान आहे. विविध घडामोडींची झटपट मालिका यात आहे. म्हणून गतीमान कथानिवेदन याचे मुख्य वैशिष्टय ठरले आहे.

"कांसे पीतांबर कंठी कुंदमाळा

कां तु शोभे सावळा :रुक्मिणीचा।"

असे श्रीकृष्णाचे रुप यातून व्यक्त केले आहे. यामध्ये धवळयातील काही प्रसंग यात जसेच्या तसे घेतले आहेत. त्यामुळे "धवळे या ध्वनीचा मातृकी रुक्मिणी स्वयंवर हाशुध्द प्रतिध्वनी आहे." [४] असे वा.ना देशपांडे यांनी म्हटले आहे. म्हणजे धवळयांचीच ही लहानशी प्रतीकृती आहे. असे म्हणता येईल. महदंबाविषयी फार कमी माहिती उपलब्ध आहे. त्यांच्या काव्यातूनच त्यांची खरी ओळख होते. महदंबांनी काही प्रासंगिक ओव्या, आरत्या व चक्रधरांचे रुपगुण वर्णनपर गीत अशा काही लघुरचना केल्या आहेत. तत्कालीन लग्नसोहळयाचे स्वरुप आणि स्त्री निर्मित गीतांचे स्वरुप महदंबा यांच्या रचनकृतींतून समजू शकते. तसेच तत्कालीन स्त्रीजीवन आणि समाजव्यवस्थेची कल्पना या काव्यावरुन येऊ शकते चक्रधरस्वामीवरील श्रध्दाभावाचे काव्य आजही मराठी साहित्यिकांच्या अभ्यासावर प्रभाव टाकते. एक शीघ्रकवयित्री तसेच मराठीतील 'आदयकवयित्री' म्हणून महदंबा यांची ओळख आहे.

* संत मुक्ताबाईः

निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई अशा चार भावंडांपैकी वयाने सर्वात लहान असूनही शहाणपणाने सर्वात मोठी म्हणून मुक्ताबाईंची ख्याती आहे. लहानपणापासूनच संतांचा सहवास लाभल्याने संतांचे अनेक गुण त्यांच्याही अंगी उतरले. अनेंक प्रकारच्या ज्ञानांची मुक्ताबाई साक्षात आगर होत्या. आपल्या ठायीचे हे ज्ञान त्यांनी अभंगातून व्यक्त केले आहे. सगुणनिर्गुणाच्या पलीकडे जाऊन खऱ्या संतपदाला पोहचलेल्या त्या 'महायोगिनी' होत्या. संत मुक्ताबाईंची आध्यात्मिक जाण फार परिपक्व होती म्हणून त्यांचा आध्यात्मिक अधिकारही मोठा होता. योगमार्गाचा त्यांना अलौकिक अनुभव होता. ज्ञानेश्वरादी भावंडांचे कुटुंब हे अनन्यसाधारण होते. सर्व भावंडांची मने अलौकिक बंधुभावाने एकरुप झाली होती. परंतु त्यांच्या अभंगनिर्मितीमध्ये मात्र गुरुन्शिष्यांचेच नाते स्पष्ट होते. लौकिक जीवनाचे नाते विसरुन आध्यात्मिक नाते जोपासताना त्यांची अभंगनिर्मिती दिसते. मुक्ताबाईच्या अभंगांचा अभ्यास करताना ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे स्वरुप लक्षात घ्यावेच लागते. डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात," मुक्ताबाईच्या अभंगवाणीने ज्ञानेश्वरकृत अभंगाच्या गाथ्याची खऱ्या अर्थाने सांगता होते." [५]

मुक्ताबाई या आजन्म कुमारीकाच राहिल्या. परंतु तत्कालीन समाजाने त्यांना संतपद बहाल करुन त्यांच्या वैवाहिक जीवनाबद्दलचा प्रश्न संपुष्टात आणला आहे. कुमारी राहूनही त्यांच्या जीवनामध्ये कुठेही कमतरता येत नाही. विठ्ठलपंत-रुक्मिणीदेवी या आई-वडिलांनी देहान्त प्रायश्चित घेतल्याने या चारही भावंडांना संन्याशाची पोरे म्हणून हीनपणाची वागणूक मिळाली. त्यामुळे या भावंडांचे बालपण हरवले गेले. नंतर समाजमान्यता मिळावी म्हणून शुध्दिपत्र मिळवण्यात किशोरावस्था संपून गेली. त्यामुळे सर्वात लहान असूनही मुक्ताबाईना अकाली प्रौढत्व आले. त्यांच्या रचनांमधून त्यांच्या विचारातील, व्यक्तित्वातील प्रगल्भता प्रकर्षाने दिसून येते.

ज्ञानेश्वरांच्या कुटुंबामध्ये मुक्ताबाई या एकमेव स्त्री असल्याने कुटुंबाची उत्तराधिकारी त्याच ठरतात. गुरुबंधूमुळे त्यांची आध्यात्मिक प्रगती लक्षणीय आहे. त्यामुळे त्यांच्या आचरणात प्रबळ आत्मविश्वास दिसून येतो. म्हणूनच मुक्ताबाईच्या अंगी फटकळपणाही रुजलेला जाणवतो. वयाने लहान असूनही मोठे कर्तृत्व स्वीकारणाऱ्या मुक्ताबाईच्या फटकळपणाला सामंजस्याची झालर लामलेली दिसत. डॉ. सुहासिनी इर्लेकर म्हणतात," मुक्ताबाईला लामलेल्या हया दुहेरी अधिकारामुळे, आपण वयाने लहान आहोत ही गोष्टही ती विसरल्यासारखी दिसते. सगुण भक्तीचा मूर्तिमंत आदर्श असणाऱ्या नामदेवाचे गर्वहरण करण्यास, चांगदेवासारख्या वयोवृध्द हटयोग्यास गुरुपदेश करण्यास व ताटीआड दडलेल्या दु:खित अपमानित ज्ञानेश्वरांचे सांत्वन करण्यास ती पुढे सरसावते ती त्यामुळेच होय." [६]

ज्ञानेश्वरादी भावंडांना संन्याशाची पोरे म्हणून हिनवले गेले. एकदा माधुकरी मागताना याच कारणाने अपमान होऊन ज्ञानेश्वर दु:खी व अपमानीत झाले. मनात निराशेचे काहूर माजल्याने संत ज्ञानेश्वरांनी रागाने स्वतःला घरात कोंडून घेतले. व ताटी म्हणजेच लाकडी फाटक आतून बंद केले. तेव्हा बाहेरुन त्यांची समजूत घालण्यासाठी आणि ताटी उघडण्यासाठी त्यांची आर्जव करताना मुक्ताबाई जे अभंग गाऊ लागल्या तेच 'ताटीचे अभंग' म्हणून प्रसिध्द झाले. मुक्ताबाईचे ताटीचे अभंग अत्यंत भावोत्कट आणि भावस्पर्शी आहेत.

" मजवरी दया करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा।

संत जेणे व्हावे । जग बोलणे सोसावे ।

तरीच अंगी थोरपण। जया नाही अभिमान।

थोरपण जेथे वसे। तेथे भूतदया असे।

योगी पावन मनाचा। साहे अपराध जनाचा।"

ज्ञानेश्वरादी भावंडांचे संतत्व समाजाने फार उशीरा मान्य केले पण या भावंडांनी आत्मप्रेरणेने उत्स्फूर्तपणे ते आधीच स्वीकारले होते. ताटीच्या अभंगातील मुक्ताबाईच्या अंतरीचे मोठेपण अफाट आहे. त्यांचा हा उपदेश ज्ञानात्मक आणि उदात्तही आहे. ताटीच्या अभंगात मुक्ताबाईनी ज्ञानदेवांना उपदेश केलेला असला तरी त्या अभंगाद्वारे ज्ञानदेवांचे सांत्वन करत आहेत ही जाणीव प्रकर्षाने होते.

मुक्ताबाईनी जेष्ठ संत नामदेवांचे एकदा गर्वहरण केले आहे. आपल्या अभंगातून उपदेश केला आहे. नामदेवांच्या एका भेटीप्रसंगी ज्ञानेश्वरादी भावंडांनी त्यांना नमस्कार केल्यावर त्यांना नामदेवांनी प्रतिनमस्कार केला नाही. ही बाब मुक्ताबाईना खटकली. आपल्या अभंगातून त्यांनी नामदेवांची फटकळपणे कानउघाडणी केलेली आहे.

"अखंड जयाला देवाचाशेजार । कां रे अहंकार नाही गेला।

मान अपमान वाढविसी हेवा। दिवस असता दिवा हाती घेसी

परब्रम्हासवे नित्य तुझा खेळ । आंधळयाचे डोहाळे कां बा झाले

कल्पतरुतळवटी इच्छिली ते गोष्टी अदयापि नरोटी राहिली का?"

याप्रमाणेच वयोवृध्द सिध्दयोगी, हटयोगी चांगदेव यांसही मुक्ताबाईनी उपदेश केला आहे. लहानग्या मुक्ताबाईना स्नान करताना पाहून मागे फिरणाऱ्या चांगदेवाला त्या उपदेश करतात. आणि इतकी वर्षे तपःश्चर्या करुनही चांगदेव अज्ञानीच राहिले आहेत. आत्म्याच्या मोठेपणापुढे तनन्मन या गोष्टी शूद्र ठरतात. हे त्यांनी आपल्या अभंगांद्वारे स्पष्ट केले आहे. म्हणूनच चांगदेवांनी त्यांना गुरु मानले. चांगदेवांना केलेल्या उपदेशात त्यांचा आध्यात्मवाद स्पष्ट होतो. मुक्ताबाईचे शिष्यत्व पत्करल्यावर चांगदेवांना त्या पुत्रवत समजून 'अवघाचि संसार केला आम्ही गोड' असा उपदेश करतात.

याप्रमाणेच मुक्ताबाईंचा योगमार्गाचा अनुभव त्यांच्या कूट अभंगातून स्पष्ट होतो.

" मुंगी उडाली आकाशी । तिने गिळले सूर्याशी

थोर नवलाव झाला। वांझे पुत्र प्रसवला

विंचू पाताळाशी जाय।शेष माथा वंदी पाय

माशी व्याली घार झाली । देखोन मुक्ताई हासली."

या कूट अभंगाचे फारसे स्पष्टीकरण करता येत नसले तरी मुक्ताबाईच्या अलौकिक योगानुभवाचा हा कूट अभंग उत्तम उदाहरण आहे. याबरोबरच मुक्ताबाईनी हरिपाठाचेही अभंग लिहिले आहेत. अंगाईगीत, पाळणागीत या स्वरुपाचे अभंग त्यांनी रचले आहेत.

मुक्ताबाईच्या संपूर्ण अभंगरचनातून त्यांच्या विद्वतेची, स्त्रीसुलभ भावनेची पुरेपुर ओळख पटते. प्राचीन मराठी साहित्यातील एक थोर संतश्रेष्ठा व थोर कवयित्री म्हणून मुक्ताबाईचा गौरव केला जातो. प्रसाद कुलकर्णी म्हणतात, " महदंबेने जशी महानुभाव संप्रदायावर अक्षरमुद्रा उमटविली तशीच अक्षरमुद्रा मुक्ताबाईने वारकरी संप्रदायावर उमटविली आहे, यातशंका नाही." [७]

संत मुक्ताबाईच्यामध्ये असलेल्या गुरुपणाचे वैशिष्टय असे की त्यांच्यापेक्षा वयाने मोठे असलेले व भक्तीक्षेत्रात जेष्ठ असलेल्या व्यक्तींनी त्यांचे शिष्यत्व पत्करले आहे.

*** संत जनाबाईः**

संत वाटिकेतील 'जुईचे फुल' किंवा 'जाईची नाजूक वेल' म्हणजे संत जनाबाई. संत नामदेवांची दासी म्हणून जनाबाईंना ओळखले जाते. दामाजी आणि कारुंड या दांपत्याच्या पोटी गोदावरी नदीच्या तीरावरचे गंगाखेड या गावी जनाबाईचा जन्म झाला. विठ्ठलभक्त असल्याने जनाबाईचे वडील पंढरीची वारी करीत. जनाबाईच्या आई-वडिलांनी त्यांना पाच-सहा वर्षाच्या असतानाच नामदेवांच्या घरी नेऊन सोडले. तिथेच त्या घरकामात रमून गेल्या. जनाबाईंनी नेहमीच स्वतःचा उल्लेख 'दासी जनी' किंवा 'नामयाची दासी जनी' असा केलेला आहे. संत नामदेव गाढे

विठ्ठलभक्त असल्याने जनाबाई ही घरकामाबरोबरच विठ्ठलभक्ती करु लागल्या. नामभक्ती मध्ये स्वतःला गुरफटून घेतल्याने अतिशय प्रभावी अभंगरचना जनाबाईकडून निर्माण झाल्या. नामदेवांच्या सहवासामुळेच त्यांना कवित्वाची स्फूर्ती झाली. नामदेवांनाच आपला पारमार्थिक गुरु मानून जनाबाईनी उत्कृष्ट असे भावगम्य अभंग लिहिले आहेत. म्हणून नामदेवांची दासी म्हणऊन घेण्यात जनाबाईना धन्यता वाटते. अखंड विठ्ठलनामाचे स्मरण हेच त्यांचे जीवनध्येय बनले होते. अत्यंत विदग्ध प्रतिमेची कवयित्री म्हणून त्यांचा नावलौकिक होता. जनाबाईचे सुमारे साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत. त्यातून भक्तीमहात्म्य, पंढरीमहात्म्य, विठ्ठल रखुमाईच्या सगुण निर्गुणाचे वर्णन व विठ्ठल भेटीची अखंड तळमळ व्यक्त झाली आहे.

" नाम फुकट चोखट । नाम घेता न ये वीट
जडशीळा ज्या सागरी । आत्मारामे नामे तारी।।
नाम विठोबाचे घ्यावे । मग पाउल टाकावे।
नाम तारक हे थोर । नामे तारिले अपार।"

संसारातील दुःखसागरातून तरुन जाण्यासाठी नामभक्तीचा मंत्र कामी येतो असा जनाबाईचा विश्वास आहे. नामभक्तीचा विश्वास त्यांच्या वरील अभंगातून व्यक्त होतो.

" विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।"

या अभंगातून संत जनाबाईनी संतचळवळीचा वारसा स्पष्ट केला आहे. विठ्ठलाचे व रखुमाईचे जनाबाईनी रेखाटलेले शब्दचित्रपर वर्णन त्यांच्या अनेक अभंगातून स्पष्ट होते. जनाबाईचे विठ्ठलावर नितांत प्रेम होते. तोच त्यांचा जीव की प्राण होता. विठ्ठलाने त्यांना वेळीच दर्शन दिले नाही तर त्या त्याच्याशी भांडत असत.

" अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारटया
तुझी रांड रंडकी झाली। जन्मसावित्रीचा चुडा ल्याली
तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे
उभी राहून अंगणी । शिव्या देत दासी जनी ।।"

असा विठ्ठलावरचा त्यांचा राग ज्वालाग्रही झाला आहे. तरीही त्यात सात्विक प्रेमच निदर्शनास येते. खुद्द विठ्ठल त्यांना घरकामात मदत करीत असे, असे जनाबाई म्हणतात. शेणी गोळा करण्यास, पाणी भरण्यास विठ्ठल त्यांना मदत करत असे. तसेच जनाबाईंचे डोके उवांनी गांजले असत्ता विठ्ठलाने त्या स्वतः मारुन केस विंचरुन जनाबाईंना मोकळे केले होते. जनाबाई म्हणतात

" दळीता कांडिता । तुज गाईन अनंता ।"

संत नामदेवांबरोबरच संत ज्ञानेश्वरांशी जनाबाईंचे आध्यात्मिक स्वरुपाचे अलौकिक नाते स्वतंत्रपणे जोडलेले आहे.

याबरोबरच त्यांनी सेना न्हावी व नामदेव यांच्यावर ही चरित्रपर अभंग लिहिले आहेत.

जनाबाईच्या अभंगातून व्यक्त होणारे स्त्रीमन हे अत्यंत सजग व भावकोमल असे झाले आहे.

" स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास
साधुसंता ऐसे केले जनी ।।
संताचे घरची दासी मी अंकिली।
विठोबाने दिली प्रेमकळा।।"

साधुसंतांमुळे आता सर्व स्त्री-शूद्रांना भक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. म्हणून स्त्री जन्माचे दुःख वाटून घेण्याचे कारण नाही असे जनाबाईंनी म्हणतात. जनाबाईंनी हरिश्चंद्राख्यान लिहिले आहे. थालीपाक, तीर्थावळी, पाळणा, दशवतारवर्णन यासारख्या स्फूटरचनाही केल्या आहेत.

जनाबाई या एक जातीवंत कवयित्री असून एक महान तपस्विनी होत्या. विठ्ठलाची नितांत भक्ती हेच त्यांनी जिवितकार्य मानले होते. जनाबाईंची कविता ही भावकविता बनलेली आहे.

*** संत कान्होपात्राः**

वारकरी संप्रदायातील कान्होपात्रा हया संतकवयित्री आहेत. इ.स. १४६९ हा त्यांचा काळ असावा. मंगळवेढयाच्या शामा नावाच्या गणिकेची कान्होपात्रा

या मुलगी होत. त्या अतिशय लावण्यवती होत्या. इतर कोणाही पुरुषाला आपला देह विकून घेण्यापेक्षा त्यांनी विठ्ठलचरणी आपले तनमन वाहून टाकले.

" पतित तू पावना। म्हणविसी नारायणा।"

कान्होपात्रा यांचे अभंग म्हणजे कारुण्य आणि आर्ततेचा कळसाध्याय आहेत. " विषयाचे संगती नाश पावले निश्चिती" असे त्यांचे म्हणणे आहे.

कान्होपात्रा यांनी स्वतःचे यातिहीनत्व आणि अनाधिकार आपल्या अभंगांमधून स्पष्ट सांगतात. तसेच लैकिक जगामध्ये आपल्याला होणारा त्रास हा आपल्यातीलच दोषांमुळे आहे. असे कान्होपात्रा मानतात. त्यांच्या अनेक अभंगांमधून विठ्ठलभेटीची आर्तव्याकूळता प्रकट झाली आहे. त्यातून त्यांची विलक्षण सात्विक भक्ती प्रकट होते.

" नको देवराया अंत आता पाहू

प्राण हा सर्वथा फुटों पाहे

मोकलीन आस जाहले उदास

घेई कान्होपात्रेस ह्रदयात।।"

कान्होपात्रा यांनी विठ्ठलाला स्वतःत सामाऊन घेण्यासाठी आर्त विनवणी केली आहे. आपण गणिकेच्या कुळात जन्मलो याची बोच त्यांना कायम होती. म्हणून त्या म्हणतात-

" हरिणीचे पाडस व्याघ्रेघरी गेले

मजलागी जाहले तैसे देवा"

अशी विठ्ठलाला त्या सूचक विनवणी करतात. " कान्होपात्रेच्या कारुण्याचे कारण तिच्या अपार्थिव जीवनापेक्षा तिच्या पार्थिव जीवनातच अधिक आहे." ८ हे ग्रामोपाध्ये यांचे विधान या संदर्भात उल्लेखनीय आहे. कान्होपात्रा यांचे अभंग हे सात्विक आणि उत्कट शक्तीचा सुंदर आविष्कार आहे.

*** संत सोयराबाई:**

मराठी वाङ्मयातील पहिल्या दलित संतकवयित्री म्हणून संत सोयराबाई यांचा उल्लेख केला जातो. संत चोखामेळा यांच्या संत सोयराबाई या पत्नी होय. संत चोखा मेळा यांची बहिण निर्मला याही संतकवयित्री आहेत. सोयराबाईंनी सरळ, निष्कपट अंतःकरणाचा प्रामाणिकपणा व्यक्त करणारे काव्य लिहिले आहे. वारकरी संप्रदायात भक्तांमध्ये भेदभाव केला जात नाही. याचा प्रत्यय सोयराबाईंना नेहमी येत असे.

" देहासी विटाळ। म्हणती सकळ ।

आत्मा तो निर्मळ। शुध्द बुध्द।

देहाचा विटाळ । देहीच निर्धारी

म्हणतसे महारी । चोखियाची।"

अस्पृश्य समाजातील असल्याने चोखामेळा व सोयाराबाईंना अतोनात छळ सहन करावा लागला. अस्पृश्यतेमुळे समाजात वावरताना विटाळ होतो. परंतु ईश्वरभक्तीमध्ये अस्पृश्यता, विटाळ या गोष्टी आड येत नाहीत. असे सोयराबाई म्हणतात. सोयराबाईचे एकूण ६२ अभंग उपलब्ध आहेत. बहुतेक अभंगांतून त्यांनी 'चोख्याची महारी ' असा स्वतःचा उल्लेख केलेला आहे. अस्पृश्यतेचे दुःख पदरी आल्याने तत्कालीन कर्मठ लोकांची कानउघडणी सोयराबाईंनी आपल्या रचनांमधून केलेली आहे.

*** संत बहिणाबाई:**

" संतकृपा झाली। इमारत फळा आली

ज्ञानेदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।

नाम तयाचा किंकर । तेणें रचिले ते आवार

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत

तुका झालासे कळस। भजन करा सावकाश

बहिणी म्हणे फडकती ध्वजा निरुपण केले वोजा।।"

भागवत संप्रदायाचा संपूर्ण इतिहासच बहिणाबाईंनी आपल्या या अभंगांतून सांगितला आहे. बहिणाबाई या संत तुकारामांच्या शिष्या होय. मराठीतील पहिले स्त्री आत्मकथन जनाबाईंचे येते नंतर बहिणाबईंनी ही आत्मकथन लिहिले. ७४ अभंगातून आलेले हे आत्मकथन अलौकिक वाङ्मयीन स्वरुप स्पष्ट करते. वयाच्या तिसऱ्या वर्षी एका बीजवराशी त्यांचा विवाह झाला. परंतु वयाच्या आठव्या वर्षी त्यांना पित्यासोबत घराबाहेर पडावे लागले. त्यानंतर अनेक ठिकाणी तीर्थयात्रा केल्यावर बहिणाबाईंचे मन हरिकीर्तनात रमून गेले. नवऱ्याकडून त्यांचा छळ झाल्याने संसारात त्या रमू शकल्या नाहीत. स्त्रीत्वाविषयीची दुखरी जाणीव त्यांच्या आत्मकथनातून स्पष्ट होते.

वयाच्या एकोणीसाव्या वर्षी बहिणाबाई संत तुकारामांच्या शिष्या बनल्या. बहिणाबाईंचे एकूण चारशे अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या अभंगातून स्पष्टवक्तेपणा, वैराग्याची तेजस्विता आणि कारुण्याचा उत्कट भाव एकवटलेला दिसून येतो. एका बाजूला प्रापंचिक जबाबदारी आणि दुसऱ्या बाजूला वैराग्याची अनिवार ओढ या कचाटयात बहिणाबाईंचे मन सापडले आहे.

" स्त्रियेंचे शरीर पराधीन देह। न चारले उपाव विरक्तीचा

शरीराचे भोग वाटतात वैरी । माझी कोण करी चिंता आता।"

'वज्रसूची' या अनादीकालीन धर्मग्रंथाचा सोप्या भाषेत अनुवाद बहिणबाईंनी केला. या वज्रसूचीमधून तत्कालीन समाजात कर्मकांडांचे महत्व वाढवणाऱ्या ब्राम्हण्यांवर बहिणाबाईंच्या कठोर हल्ला केला. बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्व घडवण्यामध्ये या वज्रसूचीचा फार मोठा प्रभाव आहे. स्वतः ब्राम्हण कुटुंबात जन्मलेल्या असूनही बहिणाबाईंनी वज्रसूची सारख्या ब्राम्हण्याचा प्रखर विरोध करणाऱ्या ग्रंथाचा अनुवाद करावा ही गोष्ट मराठी संत कवयित्रींच्या इतिहासाची व अभिमानाची उंची वाढवणारी अशीच आहे. बहिणाबाईंच्या " संतकृपा झाली। इमारत फळा आली।" हा अभंग आजही सर्व वारकऱ्यांना मुखोद्गत आहे. यातच त्याचा गौरव आहे. शं. गो. तुळपुळे या अभंगाविषयी म्हणतात,' "एवढा एकच अभंग लिहूनही त्याची कीर्ती अमर व्हावी इतके त्याचे मोल आहे." [९]

भागवत संप्रदायाच्या इमारतीचे तुकोबा कळस झाले आहेत तर बहिणाबाईंनी त्या कळसावरील फडकती ध्वजा असे स्वतःला संबोधण्यात धन्यता मानली.

## * संत वेणाबाई:

रामदास स्वामींच्या समर्थ संप्रदायातील वेणाबाई हया एक संत कवयित्री आहेत. त्यांचा जन्म कोल्हापूरात इ.स. १६२७ मध्ये झाला. वेणाबाई हया बालविधवा होत्या. श्रीरामभक्तीमध्ये त्यांनी आपले वैधव्याचे दुःख विसरले. एकदा रामदास स्वामी वेणाबाईच्या घरासमोरुन जाताना त्यांच्या दारासमोर भिक्षा मागण्यासाठी आले. त्या भेटीनंतर वेणाबाई समर्थ रामदासस्वामींच्या शिष्या बनल्या. वेणाबाईंनी 'सीतास्वयंवर' हे काव्य रचले. त्यामध्ये १४ समास असून १५४६ ओव्या आहेत. त्यानंतर त्यांनी 'रामायण' हे दुसरे काव्य लिहिले. 'सीतास्वयंवर' या वेणाबाईच्या ग्रंथातून त्यांच्या स्त्रीसुलभ भावनांचा आविष्कार पहावयास मिळतो. शं.श्री. देव म्हणतात, " सीतचे स्वयंवर वेणाबाईच्या पूर्वी व नंतर पुष्कळांनी वर्णिले आहे. पण वेणाबाईच्या ग्रंथाची योग्यता काही निराळी आहे. स्वयंवरा सारख्या प्रसंगाची आवड स्वभावतः स्त्रियांना असावयाची आणि म्हणून त्यांच्या लेखणीतून तो प्रसंग जसा उतरेल तसा इतरांच्या उतरणार नाही. वेणाबाईच्या स्वयंवरात प्रत्येक लहान मोठया प्रसंगांचे वर्णन आहे. तसे दुसऱ्या एखादया ग्रंथात असल्याचे माझ्या पाहण्यात नाही." [१०]

या व्यतिरिक्त वेणाबाईंनी 'पंचीकरण' नावाचे निबंध स्वरुपाचे गदयलेखन केले आहे. 'रामगृहकसंवाद' व 'कौल' अशी दोन छोटी आख्याने लिहिली आहेत.

" राम गुणाचा सागरु। राम सुखाचा सुखतरु
राम भक्ताचे माहेर। राम विसावा जनांचा।"

अशा स्वरुपात वेणाबाईंनी रामभक्तीचे महत्व सांगितले आहे.

वेणाबाईंनी रुपक, स्वभावोक्ती, श्लेष, अनन्वय यासारख्या अलंकारांचा उपयोग आपल्या रचनांमधून केलेला आहे. त्याचा सुंदर आविष्कार प्रतीत होतो.

अशाप्रकारे तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत सुमारे पाच शतकांच्या कालखंडात मराठी भाषेत काव्यरचना करणाऱ्या महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई व वेणाबाई हया प्रमुख संत कवयित्री आहेत.

या सर्व कवयित्रींनी विठोबाला आपले आराध्य दैवत मानले आहे. त्याला केंद्रस्थानी ठेऊनच या संत कवयित्रींनी अभंग रचना केल्या आहेत. प्रपंचाचे सुख-दुःख, जन्ममरणाचा फेरा यातून मुक्ती देणारे साधनच त्यांनी विठोबाला केले आहे. विठ्ठलभक्तीचा महिमा गात असतानाच या संत कवयित्रींनी स्वतःच्या स्त्री-दुःखाला, इच्छा आकांक्षांना सहजस्वरांमध्ये गुंफलं आहे. तत्कालिन समाजस्थितीबद्दलचे विविध प्रश्न समोर आणले आहेत.

अशाप्रकारे संत कवयित्रींनी साहित्यनिर्मिती केली असली तरी तिला संपूर्णपणे भक्तीमय वातावरणाची तसेच कारुण्याची झालर प्राप्त झाली आहे.

मराठी कवयित्रींची पूर्व परंपरा ही संत कवयित्रींचीच अजोड अशी काव्यपरंपरा आहे.

## निष्कर्ष:

१. स्त्री काव्याची मुहुर्तमेढ महदंबा यांनी बाराव्या शतकात रोवली.

२. संत कवयित्रींनी ईश्वराची भावभक्ती आपल्या काव्यातून प्रकट केली असली तरी तत्कालीन समाज स्थितीचेही भान त्यांच्या अभंगांतून जाणवते.

३. कोणत्याही संत कवयित्रींची जडण घडण ही स्वतंत्रपणे झालेली दिसत नाही. चक्रधरांच्या सानिध्यात महदंबा, ज्ञानेश्वरांमुळे मुक्ताबाई, नामदेवांमुळे जनाबाई, तुकारामांच्यामुळे बहिणाबाई आणि समर्थांमुळे वेणाबाई अशा प्रतिभासंपन्न लोकविलक्षण व्यक्तींच्या सानिध्यात या संत कवयित्रींचा विकास होताना दिसतो.

# क) स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कवयित्रींची कविता

## *स्वातंत्र्यपूर्व पूर्वकालीन कवयित्री

### (एकोणीसाव्या शतकातील कवयित्री)

महाराष्ट्रामध्ये संत चळवळीने जो समजासुधारणेचा पाया घातला, आणि आपल्या कार्यामध्ये स्त्रियांनाही सहभागी करुन घेतले. त्यातूनच मराठी संत कवयित्रींची अजोड परंपरा निर्माण झाली. इ.स. तेराव्या शतकापासून सुमारे सतराव्या शतकापर्यंत बोटावर मोजण्याइतपत का होईना पण स्त्रियांनी काव्य रचून मराठी वाङ्‌मयामध्ये मोलाची भर घातली. परंतु संत तुकाराम आणि समर्थ रामदासांनतरच्या मराठी साहित्यनिर्मितीमध्ये स्त्रियांचा सहभागच नाही. संत संप्रदायानंतर महाराष्ट्रात पंडिती संप्रदाय उदयास आला. त्यानंतर शाहीरी काव्य निर्माण झाले. परंतु पंडिती कविता आणि शाहीरी कविता यामध्ये कवयित्रींच्या काव्याचा प्रवास खंडित झालेला दिसतो.

पंडिती काव्याची परंपरा ही पंडित लोकांकडून म्हणजेच ब्राम्हणवर्गाकडून निर्माण झालेली होती. आणि तत्कालिन समाजस्थिती ही पुरुषप्रधान संस्कृतीची असल्यामुळे समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते. त्यामुळे स्त्रियांना शिक्षण देऊन साक्षर करुन त्यांच्याकडून साहित्य निर्मिती करण्याचा विचार तत्कालीन समाजाकडून होणे शक्यच नव्हते. त्यामुळे चूल आणि मूल एवढेच स्त्रीचे अस्तित्व राहिले. शाहीरी कविता ही सुध्दा डफावर थाप देऊन गाण्याचा एक प्रकार होता. ती ही पुरुष वर्गाचीच मक्तेदारी होती. त्यामुळे पूर्वपरंपरागत स्त्री निरक्षर होती ती निरक्षरच राहिली.

महात्मा ज्योतिराव फुले हे एकोणिसाव्या शतकातील थोर लोकोत्तर युगपुरुष होत. तत्कालीन वर्णव्यवस्था, जातिभेद आणि धर्मभेदांचा बिमोड करत बहुजन समाज, कष्टकरी, शेतकरी आणि स्त्रिया यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले. वारकरी संप्रदायातून उगम पावलेल्या बहुजन समाजाच्या उन्नतीचा प्रयत्न पुढे महात्मा फुलेंच्या कार्यातून अधिकाधिक दृढ होत गेला. कारण त्यांनी फक्त विचार मांडण्याचेच कार्य केले नाही तर प्रयोगशीलता आणि कृतिप्रवणता हे म. फुलेंचे वैशिष्टय म्हणावे लागेल.

म. फुलेंच्या अविश्रांत परिश्रमातूनच इ.स. १८४८ मध्ये मुलींची पहिली शाळा सुरु झाली. आणि समाजातील सर्वच थरातील स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. म. फुलेंनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना प्रथम शिक्षण दिले. त्यामुळे मुलींची शाळा प्रथम निघाली तेव्हा सावित्रीबाई फुले हया शिक्षिका बनल्या.

## * सावित्रीबाई फुले (१८३५ ते १८९३ ) :

एकोणीसाव्या शतकातील एकमेव कवयित्री म्हणजे सावित्रीबाई होय. स्त्रियांसाठी अंतःकरणात निर्माण होणारी तळमळ आणि त्याचबरोबर असणारा प्रखर प्रयत्नवाद यांच्या जोरावरच सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन स्त्री-जीवनात क्रांती घडऊन आणली. स्त्री शिक्षणाच्या त्या कट्टर पुरस्कर्त्या बनल्या. एकोणीसाव्या शतकातील तेजस्वी स्त्रीरत्न म्हणून त्यांचा गौरव केला जातो. समाजाचा अतोनात छळ सहन करत म.फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली. सावित्रीबाईंनी धीरोदात्तपणे सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात सहभाग घेतला.

सवित्रीबाईच्या या शैक्षणिक कार्याचा 1853 मध्ये ब्रिटिश अधिकारी मेजर कँडी यांच्या हस्ते गौरव झाला. सावित्रीबाईंनी दर्जेदार स्वरुपाचे काव्यलेखन केलेले आहे. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'काव्यफुले' 1854 साली शिळा प्रेसवर प्रसिध्द झाला. तर 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा काव्यसंग्रह 1892 मध्ये प्रसिध्द झाला. सामाजिक आशय आणि सुबोध रचना ही त्यांची काव्यवैशिष्टये आहेत.

**काव्यफुले-**

या काव्यसंग्रहातून सावित्रीबाईंनी शिक्षण, म.फुलेंवरील कविता, उपदेशपर कविता आणि बळीस्तोत्र इ. स्वरुपाच्या कवितांचे लेखन केलेले आहे.

**बावनकशी सुबोधरत्नाकर:**

या काव्यसंग्रहातून ज्योतिरावांकडून मिळालेली प्रेरणा, प्राचीन मध्ययुगीन कालखंडाचा इतिहास, पेशवाईतील समाजाचे वर्णन अशा स्वरुपाच्या कविता सावित्रीबाईंनी लिहिल्या आहेत.

सावित्रीबाईच्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कविता अतिशय मार्मिक स्वरुपाच्या आहेत. त्यातही शिक्षणालाच प्रथम स्थान दिलेले आहे.

'शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा

शिक्षणाने मनुष्यत्व मिळते, पशुत्व हटते पहा।"

याचबरोबर त्यांच्या 'तयास मानव म्हणावे का?' या कवितेतून माणसाने करावयाचे कर्म याचे मूलभूत चिंतन प्रकट केले आहे.

"ज्ञान नाही विदया नाही

ते घेणेची गोडी नाही

बुध्दी असुनि चालत नाही

तयास मानव म्हणावे का?"

सावित्रीबाईंनी काही काव्यविषयक कविता केल्या आहेत. त्या कवितेतून सावित्रीबाई म्हणतात-

"कधी कल्पी मी विश्वामित्र आहे

काव्य माझे हे प्रतिसृष्टी आहे."

सावित्रीबाईंच्या आत्मपर कवितांमधून पतीविषयक कविता येतात. तसेच 'संसाराची वाट' 'माझी जन्मभूमी' या कविताही येतात. म. जोतिरावांविषयी सावित्रीबाई लिहितात

"माझ्या जीवनात जोतीबा स्वानंद

जैसा कळीतला मकरंद"

त्यांच्या निसर्गकवितांतून 'जाईचे फूल' 'जाईची कळी' , 'पिवळा चाफा' 'मानव व सृष्टी' , 'मातीचा महिमा' इ. कविता सुंदर निसर्गवर्णन करतात.

१८७६-७७ च्या दुष्काळाचे वर्णन करताना सावित्रीबाई लिहितात-

"नाही पडला पाऊस कोठेही । म्हणून पीकपाणी नाही काही।

याने होती दुष्काळालाही । कोप नसे देवाचा।। "

काव्यवैशिष्टये :

प्रसादगुणयुक्त शैली त्यांच्या काव्यातून दिसून येते. त्यांनी अभंग-ओवी छंदात्मक काव्यलेखन केलेले आहे. परंतु कुठेही अलंकारांचा वापर केलेला नाही. स्फूटरचनात्मक काव्यलेखन आहे. विषय वेगवेगळे आहेत. तसेच प्रत्येक काव्यलेखनाची पार्श्वभूमी ही सामाजिक भूमिकेला धरुन आहे. अशी ही सावित्रीबाईंच्या काव्यलेखनाची वैशिष्टये आहेत.

सावित्रीबाई फुले यांच्या कवितेविषयी कृ.प. देशपांडे म्हणतात "अर्वाचीन मराठी साहित्यात केशवसुतांनी पुढे जी क्रांती केली असे आपण म्हणतो, त्याची पूर्वतयारी या कवितांनी केली, असे म्हणायला हरकत नाही. सावित्रीबाई हया अर्वाचीन मराठी काव्याच्या जननी होत्या. किंवा 'केशवसुतांचे काव्य ही अर्वाचीन मराठी काव्यातील फक्त एक प्रगत अवस्था होती' असे उद्या कोणी सिध्द केले तर मला पण नवल वाटणार नाही."[१७]

## निष्कर्ष:

१. महाराष्ट्रामध्ये संत चळवळीच्या माध्यमातून संत कवयित्रींची अजोड परंपरा निर्माण झाली.

२. परंतु पंडिती कविता आणि शाहीरी कविता यांमध्ये कवयित्रींच्या काव्याचा प्रवास खंडीत झालेला दिसतो. याचे एक कारण पुरुषप्रधान संस्कृती हे असू शकेल.

३. महाराष्ट्रामध्ये संतचळवळींने बहुजनसमाजसुधारणेचा जो पाया घातला, त्यांच्या उन्नतीचा प्रयत्न पुढे एकोणीसाव्या शतकात म.फुले आदी समाजसुधारकांनी अधिकाधिक दृढ केला.

४. पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले हया एकोणीसाव्या शतकातील एकमेव कवयित्री आहेत. आणि अर्वाचीन कवितेच्या जननी होत.

## * स्वातंत्र्यपूर्व कालीन कवयित्री :

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे जनक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि दलितांचे उध्दारक म.फुलेंनी तत्कालीन समाजात जी क्रांती घडऊन आणली आणि स्त्री शिक्षणाला प्रारंभ केला. त्यातूनच पुढे आगरकर, लोकहितवादी, महर्षी कर्वे यांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्यप्राप्ती बरोबरच स्त्री शिक्षणला-सर्वसामान्य स्त्रियांना शिक्षण देण्याचे कार्य महत्वाचे मानले गेले.

या सुधारक नेत्यांच्या बरोबरीने काही विचारी सामान्य माणसेही उभी राहिली. त्यांनी आपल्या बायकोला, बहिणीला, मुलीला शिक्षण देऊ केले. तिला स्वतंत्रपणे जगण्याची संधी दिली. त्यामुळे स्त्रीला स्वस्थितीची जाणीव झाली. आपली अस्मिता, आपले सामर्थ्य, स्वत्त्व याची जाणीव झाली.

स्त्री शिक्षणाची सुरुवात म.फुलेंनी केली. नंतरच्या काळात स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्यासाठी महर्षी कर्वे, वि.रा. शिंदे, पंडिता रमाबाईसारख्या समाजसुधारकांनी अपरंपार कष्ट घेतले. महर्षी धोंडो केशव कर्वेनी आपल्या अथक परिश्रमातून केवळ महिलांसाठी असलेले ' श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ ' १९२६ साली स्थापन केले. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक सुधारकांची मते जनसामान्यांपर्यत पोहाचवण्याचे कार्य नियतकालिके तसेच निबंध करीत असत. बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ मध्ये 'दर्पण' तर भाऊ महाजन यांचे 'प्रभाकर ' हे १८४२ मध्ये वृत्तपत्र. सुरु झाले. त्यांच काळात लोकतिवादींची शतपत्रे सुरु झाली. बहुदा सर्वच नियतकालिकांनी ज्ञानाचा प्रसार केला. जुन्या कर्मठ कर्मकांडांवर आक्षेप घेतला. समाज शिक्षणासाठी जनजागृती आणि मत परिवर्तन घडऊन आणले. या सर्वांनीच समाज जागृतीचे कार्य केले आहे.

## *स्त्री साहित्याच्या निर्मितीस प्रारंभः

साधारणपणे विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या पहिल्या दशकातच स्त्री-काव्याचे संग्रह प्रकाशित होऊ लागले. त्याचे स्वरुप बहुदा स्वतंत्र किंवा संपादित असेच होते. या काळातील स्त्रियांनी केलेल्या रचना हया गीत किंवा गाणे या स्वरुपाच्या होत्या. काव्याची जी मौख्यिक परंपरा होती, त्यातील जी पारंपारिक गीते होती त्याचाच विस्तारीत आविष्कार या काळातील रचनांमध्ये दिसतो. स्त्रीगीत रत्नाकर

(१९०३, पार्वतीबाई गोखले), बायकांच्या सभेतील गाणी, (१९०८, राधाबाई महेश्वरकर), सावित्रीचे गाणे (१९१३, गंगाबाई विजापूरकर), 'अंतर्गृहातील गीते (१९१७, सरस्वती टिपणीस), फेराची गाणी (१९१२, मनुबाई भोरकर) अशी या काव्यसंग्रहांची नावे आहेत. नैमत्यिक स्वरुपाची व्रतवैकल्ये, सणन्उत्सव आणि संसारजीवनाशी एकरुप असणारी अशी ती काव्यरचना होती. हीच परंपरा पुढे १९५० पर्यंत कमीन्अधिक प्रमाणात अस्तित्वात होती.

सावित्रीबाई फुले आधुनिक काव्याच्या जननी होत्या. किंवा केशवसुतांनी त्या काव्याचा प्रगत अवस्था दिली तरी ते नवे वळण स्त्रीकाव्यामध्ये दिसत नाही. १९५० पर्यंतची कविता आत्मप्रकटनांचा आनंद आणि हौस अशा प्रेरणांतून निर्माण झाली. १९२० ते १९५० या काळात स्त्रीच्या संसाराची, आणि स्त्रीपुरुषाच्या सहजीवनाची निर्मळ अभिव्यक्ती काव्यात प्रतीत होताना दिसते. गीत आणि गाणी यांच्या पुढे जाऊन बदलत्या आशयाचे चित्र काव्यसंग्रहांच्या शीर्षकांतूनही जाणवते. उदा.– यमुनातरंग (यमुना नागपूरकर) प्रेमाद्गार गीत (अन्नपूर्णा दीक्षित), भावकुसुमांजली (मनोरमा नावलेकर) गीतद्विदल (कमलाबाई देशपांडे) अशी शीर्षके आशयसूचक वाटतात.

१९५० पर्यंतच्या कवितेचे स्वरुप वर्णनपर, कथनपर होते. त्यातूनही कवयित्रींनी फक्त 'मी' चेच स्वरुप न दाखवता पूर्वपरंपरागत चालत आलेल्या कौटुंबिक पार्श्वभूमीचे प्रतिबिंब प्रकट करताना 'आम्ही' चेच स्वरुप व्यक्त केले आहे. मध्यमवर्गीय स्त्रीच्या सहज साध्या कल्पना शब्दांतून व्यक्त होताना दिसतात. त्या काळातील प्रसिध्द कवींच्या काव्यवैशिष्टयांची छाप या कवयित्रींच्या काव्यावर दिसून येते. या काळातील स्त्रियांच्या काव्याला कौतुकापुरतीच मान्यता मिळाली. तिला सामाजिक पातळीवर कोणताही मानसन्मान मिळाला नाही.

स्त्री शिक्षणाला जरी सुरुवात झाली असली तरी पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा याही काळात असल्यामुळेच स्त्रियांची कविता मर्यादित राहिली. तिला स्वतंत्र अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यच मिळाले नाही. त्यामुळेच १९२० ते १९४५ या कालखंडात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 'रविकिरण मंडळातही' मनोरमा बाई रानडे या एकमेवच कवयित्री होत्या.

स्वातंत्र्यपूर्वकाळात केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी इ, दिग्गज कवींनी काव्याच्या प्रांतात उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी त्यांच्या समकालीन कवयित्री तेवढयाच ताकतीनिशी निर्माण झाल्या नाहीत.

१९५० च्या दशकात 'लक्ष्मीबाई टिळक' यांचा 'भरली घागर' (१९५१) आणि त्यापाठोपाठ लगेचच 'बहिणाबाई चौधरी' यांचा 'बहिणबाईची गाणी ' (१९५२) हे काव्यसंग्रह प्रसिध्द झाले. पूर्णतः साक्षर आणि स्वातंत्र्य नसूनही या कवयित्रींच्या काव्यातून प्रासादिक रचनांची परिपक्वता दिसते. या दोन्ही कवयित्रींनी स्त्री जीवनाचे यथार्थ चित्रण आपल्या काव्यातून केलेले आहे. खरे तर या दोन्ही कवयित्रींनी रचलेल्या काव्यरचनांचा कालावधी हा १९१० ते १९२० च्या दरम्यानचा आहे. परंतु त्यांच्या काव्याची प्रसिध्दी ही उशिरा १९५० च्या सुमारास झाली.

* लक्ष्मीबाई टिळक:

'भरली घागर' या काव्यसंग्रहातून लक्ष्मीबाई टिळकांनी परंपरागत स्त्री मनाची प्रापंचिक सुखन्दुःखे मांडलेली आहेत. लक्ष्मीबाई टिळक यांचे पती रेव्हरंड ना.वा. टिळक यांच्या सहवासाने व संस्काराने लक्ष्मीबाईंचे काव्य निर्माण झाले. त्यावर ना.वा. टिळकांचा प्रभाव जाणवतो. तसेच त्यांच्याच घरी वास्तव्यास असलेल्या व लक्ष्मीबाईंनी पुत्रवत मानलेल्या बालकवींच्या सहवासाचा प्रभाव त्यांच्या व्यक्तीमनावर होऊन त्याची परिणीत काव्यातून होताना दिसते. स्त्री-पुरुषाचे जीवन हे वेगवेगळे नसून ते एकाच प्रापंचिक धाग्याने बांधले गेलेले आहेत. स्त्री-पुरुष एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. असा आशय व्यक्त करणारी लक्ष्मीबाईंची कविता आहे.

"असो पुरुष वा असो स्त्री जगी स्वयंसिध्द नच कोणी ।
परस्परांवीण अपूर्ण दोन्ही घेई नीट बघोमी । "

असे लक्ष्मीबाईंचे म्हणणे आहे.

लक्ष्मीबाईंनी आपल्या लेखन कौशल्याचा अपूर्व साक्षात्कार करत 'स्मृतिचित्रे' नावाचे आत्मचरित्रही लिहिले आहे.

बहिणाबाई चौधरी (१८८० ते १९५१) :

बहिणाबाईंची कविता ही काळयामातीतून उगवलेल्या पिवळया सोन्यासारखी लखलखीत आहे. बहिणाबाईंच्या कवितेविषयी आचार्य अत्रेंनी म्हटले आहे 'जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल असे त्याचे तेज आहे.'

उपजत काव्यशक्ती असणाऱ्या या कवयित्रीने खानदेशी अहिराणी बोलीभाषेत कविता रचल्या आहेत. निरक्षर असूनही कवितेतून जीवनदर्शन घडवण्याची

ताकद त्यांच्या ठायी आहे. शेतात, घरात काम करताना येणारे अनुभव उत्कटतेने त्यांच्या कवितांतून व्यक्त होतात. त्यातून ग्रामजीवन,संस्कृती आणि निसर्ग यांचे सुरेख चित्रण येते. त्यांच्या अनुभवांना जीवन चिंतनाची जोड असल्यामुळे त्यांची कविता अधिक समर्पक अधिक अर्थपूर्ण होते. गेयता, उपदेशपरता, कल्पनाविलास, कथात्मकता व प्रत्ययकारी शब्दरचना ही त्यांची काव्यवैशिष्टये आहेत.

'बहिणाबाईची गाणी' या काव्यसंग्रहात त्यांच्या सर्व कविता संकलित केल्या आहेत. माणसाने केवळ स्वार्थाच्या मागे लागून दुष्टबुध्दीने वागू नये. उदार अंतःकरणाने दुसऱ्याच्या सुखात सुख मानावे. परोपकारी असावे असा मौलिक उपदेश त्या करतात.

"नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेतं नही पोटासाठी
हिरीताचं देनं घेतं नही डाडोराकरता
गेली देही निंघीसनी नाव रे शेवटी "

म्हणजे आपला देह नाशिवंत आहे, शेवटी तो शिल्लक रहात नाही. आपले नाव मात्र कायम लक्षात राहते. म्हणून माणसाने स्वार्थाचा त्याग करावा. असे त्या म्हणतात.

आणखी एका कवितेतून बहिणाबाईंनी जीवनाचे सार सांगितले आहे.

"येहेरीत दोन मोटा दोन्हींमधी पानी एक
आडोयाले कना,चाक दोन्हींमधी गती एक"

विहिरीवर चालणाऱ्या मोटेचे हुबेहुब वर्णन करता करताच त्या माणसाच्या जीवनातील संसाररुपी रथाचे वर्णन करतात. स्त्री-पुरुष ही संसाररथाची दोन चाकं आहेत आणि जीवन जगताना त्यांमध्ये एकच गती असली पाहिजे तरच संसार नेटका होतो. असा पारमार्थिक अर्थ या कवितेत भरुन राहिला आहे.

बहिणाबाईच्या 'योगी आणि सासुरवाशीण' कवितेत योगी सासुरवाशीणीला प्रश्न विचारतो की सारखं माहेराचं गुणगान गात असतेस तर मग सासरी कशाला आलीस? या प्रश्नाला सासुरवाशीण जे उत्तर देते ते तिच्या नितळ स्त्रीमनाचे, सोज्वळ भावनांचे प्रतिबिंब आहे.

"दे रे दे रे योग्या ध्यान
ऐक काय मी सांगते
लेकीच्या माहेरासाठी
माय सासरी नांदते"

लेकीला माहेराचे सुख मिळावे म्हणून आई सासरी आनंदाने नांदते असे बहिणाबाई म्हणतात. बहिणाबाईंची कविता ही भावगीतेच आहेत. काव्यात असणारे सगळे गुण या कवितेत आहेत. म्हणूनच इंदिरा संतांना ही कविता फुलातून येणाऱ्या सुगंधाप्रमाणे दरवळत राहते असे वाटते. एका अशिक्षित कष्टाळू स्त्रीने "माझी माय सरसोती, माले शिकवते बोली." अशी प्रांजळ कबुली दिली आहे. निसर्गातील प्रतिमांचा आविष्कार बहिणाबाईंच्या काव्यात सदोदितपणे होताना दिसतो. म्हणूनच बहिणाबाईंना 'निसर्ग कन्या' म्हटले जाते.

पद्मा लोकूर यांनी, "बहिणाबाईंचे काव्य म्हणजे जागेपणाचे एक स्वप्न"[१२] असे म्हटले आहे.

बहिणाबाईंनी स्वतः मौख्यिक रचना केल्या आहेत. त्यानंतर लिखित स्वरुपात त्या प्रकाशित झाल्या.

प्रतिभेची अलौकिक देणगी लाभलेल्या बहिणाबाई ह्या कवियित्री होत.

लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी यांच्यामुळे मराठी कवितेमध्ये कवयित्रींचे स्वतःचे असे महत्वपूर्ण स्थान निर्माण झाले. मध्यमवर्गीय स्त्रीच्या मनाची संवेदना हा लक्ष्मीबाईंच्या काव्यनिर्मितीचा केंद्रबिंदू होता तर बहिणाबाईंची कविता ही ग्रामीण जीवनाबरोबर संस्कृती निसर्ग आणि जीवन चिंतनाचा उत्कटपणे परामर्श घेणारी ठरली. परंपरागत संस्कार, कौटुंबिक तत्वे स्त्री जाणिवा यांच्यावर ही कविता आधारलेली आहे. लक्ष्मीबाईंच्या आणि बहिणाबाईंच्या कविता जरी १९५१ साली प्रकाशित झाल्या तरी त्यांचा निर्मिती काळ हा फार आधीचा आहे. या दोन्ही कवयित्रींच्या काव्याविषयी रा.ग.जाधव म्हणतात, "एका दृष्टिने स्त्रीत्वाचे समग्र प्रपंचीकरण करणारी ती संवेदनशीलता होती."[१३]

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या दोन कवयित्रींनी आपल्या काव्यातून मराठी वाङ्मय परंपरेत मोलाची भर घातलेली आहे.

## निष्कर्ष:

१. १९व्या शतकापासून स्त्री शिक्षणाला प्रारंभ झाला. त्यामुळे स्त्रियांना त्यांच्यावरील बंधनाची जाणीव झाली.

२. या काळातील सुरुवातीचे काव्य हे गीत किंवा गाणे या स्वरुपाचे होते.

३. २० व्या शतकातील सुरुवातीच्या काळातील स्त्रियांनी केलेल्या कवितांचे विषयशीर्षकेही प्रपंचाशी, सणउत्सवांशी निगडीत होती.

४. लक्ष्मीबाई टिळकांच्या काव्यातून परंपरागत स्त्री मनाची प्रापंचिक सुखदु:खे येतात. तर बहिणाबाईच्या काव्यातून ग्रामीण जीवन, संस्कृती, निसर्ग, संसाराचे चिंतन या जाणीवा प्रकट होतात.

५. लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी यांचे काव्य हे स्त्रीमन संवेदनांचे प्रतिनिधित्व करणारे होते.

## स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कवयित्रींची कविताः

स्वातंत्र्योत्तर कालीन कवयित्रींची कविता ही अधिक प्रगल्भ होताना दिसते. १९५० नंतरचा काळ हा स्त्री काव्याच्या दृष्टिने महत्वाचा आहे. असे म्हटले पाहिजे. १९५१ साली लक्ष्मीबाई टिळकांचा 'भरली घागर' आणि १९५२ साली बहिणाबाईंची गाणी हे संपादित काव्यसंग्रह प्रकाशित झाले. परंतु या कवयित्रींचा काव्यलेखनाचा काळ हा खूप आधीचा होता.

१९५० नंतरच्या काळात इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके, वृंदा लिमये, शिरीष पै इ. कवयित्रींची कविता अधिक बहरली. या कवयित्रींना पहिल्या महत्त्वपूर्ण पिढीतील कवयित्री म्हणायला हवे. या ज्येष्ठ कवयित्रींनी भावकविता जरी लिहिली असली तरी ती अधिक चिंतनशील झालेली आहे. त्यांच्या कवितांमधून स्त्री जीवनातील विविध अवस्थांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कवयित्रींनी केलेला दिसतो.

### *इंदिरा संतः

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये इंदिरा संतांची कविता अधिक प्रभावशाली ठरली. रविकिरण मंडळात सहभागी असूनही इंदिरा संतांनी स्वतःची अशी खास शैली निर्माण केली. त्यांच्या या शैलीला मराठी स्त्रीगीतांच्या संस्काराची जोड मिळाली आहे. उत्कट भावनांचा आविष्कार हे त्यांचे काव्य वैशिष्टय होय. कोणत्याही काव्यसंप्रदायाची बांधिलकी न स्वीकरता इंदिरा संतांनी प्रदीर्घ काव्यप्रवासात आपल्या कवितेचे स्वत्व जोपासले. त्यांच्या काव्यलेखनाची सुरुवात वयाच्या सोळा-सतराव्या वर्षीच म्हणजे १९३०-३१ साली झाली आहे. आपल्या कवितेविषयी स्वतः इंदिराबाई म्हणतात,"जे वाटलं ते जाणवलं पण सरळ सांगता येत नाही, असं काही शब्दांमध्ये पकडण्याची मला आवड आहे."

पती निधनानंतर त्यांचा 'सहवास (१९४१) हा इंदिरा संत आणि पती नारायण संत यांचा संयुक्त संग्रह प्रकाशित झाला. त्यानंतर शेला (१९५१) , मेंदी (१९५५) , मृगजळ (१९५७) रंगबावरी (१९६४) , बाहुल्या (१९७२) , गर्भरेशीम (१९८२). हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

चिरंतन विरह सहन करणारी प्रीती आणि निसर्ग हा इंदिरा संताच्या कवितांचा स्थायीभाव आहे. सुखदःखाचे, सूक्ष्म, तरल अनुभव निसर्ग प्रतिमातून त्या व्यक्त करतात. त्यांच्या कवितेतील निसर्ग हा प्रियकराचे रुप घेऊन येतो. पतीनिधनानंतरच्या काव्यामध्ये पतीविरहाची भावना प्रतीत होते. इंदिरा संत हया 40 वर्षाच्या बदलत्या काळातील बदलत्या स्त्रीजीवनाचा सतत मागोवा घेत राहतात. त्यांच्या काव्यातून आधुनिक स्त्रीचे नोकरी करणाऱ्या स्त्रीचे चित्रण येते. स्त्रीच्या हालअपेष्टा, घरातलं दुय्यम स्थान, घरकाम, आयुष्यातला कंटाळलेपणा यांचे वर्णन काव्यातून येते. नोकरी करणारी स्त्री दोन्ही बाजूंनी होरपळून निघते-

"शिजणारी ही तीच, शिजवणारीही तीच!"

असे तिचे रुप प्रगट केले आहे. घरसंसार सांभाळून, नोकरी करुन तिला संसारात महत्वाचे स्थान नाही-

"मी म्हणजे केरवारा, स्वैपाकपाणी
मी म्हणजे आवक जावक बिले पावत्या
मी म्हणजे बौध्दिकांची रतीब-गाळणी
मी म्हणजे हेच काही चैतन्याची चमक नाही.
चालत्या बोलत्या पाषाणाला सुख नाही दुःख नाही."

अश्विनी धोंगडे या कवितेविषयी म्हणतात,"स्त्रीला दिलेली चालत्या बोलत्या पाषाणाची उपमा संसारातील तिचं गोठलेलं स्थान व्यक्त करायला पुरेशी समर्थ आहे." [१४]

तसेच गंगाधर गाडगीळ इंदिरा संतांच्या काव्याविषयी गौरवाद्गार काढताना म्हणतात," हस्तीदंती तुकडयावरचे कोरीव काम." [१५] अशी इंदिरा संतांची कविता आहे.

इंदिरा संतांची कविता ही 'स्त्रीवादी' प्रेरणेतून झालेली नाही. स्त्रीदुःखाचे तथाकथित वर्णन यातून आले असले तरी त्यांच्या कवितातून चिरविरही प्रेम, संसाराच्या जाचात अडकलेल्या स्त्रीचे वर्णन येते. त्यांची कविता ही भावकविताच बनलेली आहे.

* पद्मा गोळे:

स्त्रीमनाच्या विविध रुपांचा आविष्कार करत स्त्रीत्वाचा शोध घेणारी अशी पद्मा गोळेंची कविता आहे. आपल्या काव्यातून त्यांनी कौटुंबिक गृहचित्रणाबरोबरच स्त्री मनाच्या भावभावनांचे चित्रण केलेले आहे. मंदा खांडगे म्हणतात,"स्त्रीशक्तीचे

प्रतिनिधित्व करताना, स्त्रीच्या अस्मितेचा काव्यात्म पातळीवरील शोध त्यातून स्त्रीत्वाच्या गाभ्याला केलेला स्पर्श, तिचं होणारं शोषण. तिला करावा लागणारा संघर्ष हे नेटकेपणानं काव्यातनं टिपणारी पद्माबाईंची कविता तिच्या विशेष गुणांनी मराठी काव्यात ठाशीवपणे व्यक्त होते." [१६]

आधुनिक स्वरुपाचा विचार करणारी स्त्री त्यांच्या कवितेतून दिसते.

"नाही मी नुसती मादी, मी माणूस माणूस आधी."

माणूसपणाचा अधिकार मागताना त्यांची कविता दिसते. नव्या युगातील स्त्रीचे स्वत्व, आत्ममान त्यांनी आपल्या कवितेतून प्रकट केलेले आहे:-

"अर्धी मानवता मी, मजला पाहीन दासी ठेवील कोण?"

स्वतःवर ठाम विश्वास ठेऊन, स्वतःच्या अस्तित्वासाठी, जगण्यासाठी मोकळा श्वास घेण्यासाठी लागणारी जाणीव पद्मा गोळेंच्या काव्यातून प्रतीत होते.

नीहार, स्वप्नजा, आकाशवेडी, प्रीतीपथावर, श्रावणमेघ हे पद्मा गोळे यांचे काव्यसंग्रह आहेत. स्त्रीमनाच्या आविष्काराबरोबरच उत्कट निसर्गप्रेम, नादमय भाषा आणि सुगम अभिव्यक्ती हे त्यांचे काव्यलेखन विशेष आहेत.

स्त्रीच्या अस्मितेची, तिच्या भावविश्वाची झालेली सखोल जाणीव पद्मा गोळेंच्या काव्यातून व्यक्त होते.

*संजीवनी मराठे:

संजीवनी मराठेंनी प्रामुख्याने प्रियकर आणि प्रेयसी यांच्यातील नातेसंबंध प्रतीत करणारे काव्यलेखन केलेले आहे. त्यांचे काव्य संजीवनी (१९३२) , राका (१९३९) , संसार (१९४२) छाया (१९४९) आणि मी दिवाणी इ. काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

'मी दिवाणी' काव्यसंग्रहात स्त्रीमनाच्या अनेक रुपांचे वर्णन येते.

"मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी
कलावती शास्त्रज्ञा , विविधगुणी नटते मी
विश्वाची मी प्रतिभा मजमधि समृध्दी वसे,
संस्कृति मी जणु समूर्त, स्त्री माझे नाव असे"

त्यांच्या नंतरच्या काळातील कवितांमधून आधुनिक स्त्रीचे वर्णन येते.

"शांत सागरी कशास उठलीस वादळे?
काय हे तुझ्यामुळे देहभान हरपले
युगासम भासतात आज नाचरी पळे
निमिष मात्र लोचनात दिव्य तेज दाविलेस."

अशी संजीवनी मराठे यांची कविता ही गीतरचनेच्या स्वरुपाची होती. त्यांच्या अनुभव घेण्याच्या विशिष्ट पध्दतीने स्त्रीच्या विविध रुपांचा आविष्कार करणारी कविता साकार होताना दिसते.

*शांता शेळके :

शांता शेळके या मराठी साहित्यातील एक ज्येष्ठ कवयित्री आहेत. गीतरुपता हे त्यांच्या काव्यलेखनाचे वैशिष्टय आहे. अगदी शब्दचित्रमय पध्दतीने रचना असलेल्या शांता शेळकेंच्या कविता अतिशय लोकप्रिय ठरल्या. मराठी चित्रपटांसाठीही त्यांनी गीते लिहलेली आहेत.

तोच चंद्रमा, कळयाचे दिवस फुलांच्या राती, जन्मजान्हवी, रुपसी, वर्षा, गोंदण हे त्यांचे प्रसिध्द काव्यसंग्रह आहेत.

त्यांच्या कवितेतून स्त्री अनुभवविषयक जाणीवा बऱ्याचअंशी रेखाटल्या आहेत. स्त्री म्हणून जगताना आलेले अनुभव आणि त्यातून जीवनाकडे पाहण्याची आलेली दृष्टी याची जाणीव कवितेतून प्रकट करताना त्या म्हणतात-

"मग पटापट मिटतच गेले दरवाजे
नंतर शिवलेले ओठ, मिळालेली आणभाक
आणि एका बंद दाराशी मी उभी
माझेच घर होते ते पण दरवाजा उघडलाच नाही."

(अनोळख पृ.४७)

परंपरागत पध्दतीने स्त्रीच्या जगण्याच्या आकांक्षा मोडीत काढत स्वतःचे घरही तिच्यासाठी परके होऊन जाते. अशी दुखरी जाणीव यातून व्यक्त होते. आधुनिक स्त्रीला जगण्यासाठी कसरतच करावी लागते. लोकांच्या वाईट नजरांपासून स्वतःचा बचाव करावा लागतो.

15914

"बसच्या रांगेत अंग चोरुन उभी एक एकटी पोर
साडी अंगभर, गळयाशी पदर नजर नाकासमोर
खेटणाऱ्या गर्दीत तिने जपलेले अस्पर्शित निर्मळपण
मनातला काळोख हरघडी होणारा गडद काळाभोर"

(बसच्या रांगेत)

स्त्री विशिष्ट जाणीव या कवितेतून प्रत्ययाला येते. शांता शेळकेंनी आपल्या 'मायलेकी' या कवितेतून येणाऱ्या नव्या पिढीचे स्वतंत्र भविष्य आहे. हे स्पष्ट करतात-

"माजघरातल्या हडप्यामध्ये तिचा
बंदिस्त भूतकाळ आणि
मुलीसमोर उघडा तिचा लख्ख स्वतंत्र भविष्यकाळ."

(मायलेकी)

परंपरेने बंदिस्त करुन ठेवलेल्या स्त्रीपेक्षा आधुनिक काळामधील स्त्रीने स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवावे असे कवयित्री सांगते.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपल्या कवितांमधून अनोखी प्रतिमासृष्टी आणि अस्सल शब्दकळा या गुणवैशिष्टयांनी शांता शेळके यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे.

* शिरीष पैः

हायकू , एका पावसाळयात, एकतारी हे शिरीष पै यांचे काव्यसंग्रह 'हायकू' या काव्यसंग्रहातून त्यांनी अकृत्रिम कवितांच्या स्वरुपात एक वेगळा प्रयोग केलेला दिसतो. शिरीष पै यांची कविता भावोत्कट होताना दिसते.

असा स्त्रीममाचा स्थायीभाव आणि स्वतःचे असणारे अस्तित्व आणि त्याचे भान जपत पुढे अनेक कवयित्रींनी काव्यलेखन केले. संजीवनी बाबर, योगिनी जोगळेकर, सुहासिनी इर्लेकर, अनुराधा पोतदार इ. कवयित्रींचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत.

## तात्पर्यः

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तरकालीन कवयित्रींचे काव्यरचना आहे. स्त्री शिक्षणाचा जोरदार प्रसार झाल्याने स्त्रीचे आत्मभान जागे झाले. आणि बदललेल्या जीवनाशी समायोजन करुन घेत असताना तिच्या मनाची बदलणारी स्थित्यंतरे या काव्यातून व्यक्त होतात. आधुनिक काळाच्या पार्श्वभूमीवर नोकरी करणारी स्त्री या कवितांमधूनच दिसायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे तिच्यात होणाऱ्या आत्मभानाचा निग्रहीपणा या कवयित्रींनी जोपासला आहे.

नव्या विचारांनी भारलेली आणि स्त्रीत्वाचा शोध घेणारी अशी ही कविता असली तरी तिला प्रखरतेने स्त्रीवादी जाणिवेतून व्यक्त केलेले नाही. स्त्रीमनाचा स्वच्छ आरसा यातून प्रतीत होतो. हया कवयित्रींची कविता भावगर्भ आणि चिंतनशील मात्र जरुर बनलेली आहे.

## निष्कर्ष:

१. २० व्या शतकाच्या सुरुवातीस स्त्रियांनी केलेल्या काव्याचे संग्रह प्रकाशित होऊ लागले. परंतु ती कविता वरपांगी कौतुका पुरतीच राहिली.

२. लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी या कवयित्रींच्या नंतरच्या काळातील स्त्री काव्याने आधुनिक काळातील स्त्रीवादी काव्याच्या पाउलखुणा उमटवल्या.

३. आपले आत्मभान आणि अस्तित्वभान जपत या कवयित्रींनी नवकाव्यांचा जोरदार प्रवाह निर्माण केला.

४. स्वातंत्र्योत्तर काळातील इंदिरा संत, शांता शेळके आदी कवयित्रींनी १९८० नंतर निर्माण झालेल्या आधुनिक स्त्रीवादी कवितेचा पाया घातला.

५. १९५० ते १९८० या काळातील पहिल्या महत्वपूर्ण पिढीतील कवयित्रींची कविता भावकविता जरी असली तरी ती अधिक चिंतनशील बनलेली आहे.

६. मराठी कवितेची आदयपरंपरा आणि मराठी कवयित्रींची पूर्वपरंपरा पाहिल्यानंतर आता पुढील प्रकरण दोन मधून स्त्रीवादी साहित्याचे स्वरुप प्रकट होईल.

# संदर्भ


| | |
|---|---|
| १) श्री. प्रसाद कुलकणी– | 'स्त्री विषयक दृष्टिकोन आणि संत कवयित्री' प्रबोधन प्रकाशन ज्योती मे. १९९९ इचलकरंजी, कोल्हापूर, पृ.२३ |
| २) तत्रैव – | पृ.१७ |
| ३) तत्रैव – | पृ.१७ |
| ४) वा.ना. देशपांडे– | (सं.)महदंबा –आदय मराठी कवियित्री कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे द्वितीयावृत्ती १९७६ पृ .२१ |
| ७)डॉ सुहासिनी इर्लेकर– | 'प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य' परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८० पृ. ११४ |
| ६)तत्रैव – | पृ.११६ |
| ७)प्रसाद कुलकर्णी– | उ.नि.पृ.३० |
| ८)ल.रा. नसिराबादकर– | 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर आवृत्ती *आठवी जुलै २००७ पृ.१०९* |
| *९)तत्रैव –* | *पृ. १६२* |
| *१०)तत्रैव –* | *पृ.१७९* |
| *११)कृ.प.देशपांडे–* | *सावित्रीबाईंची काव्यसंपदा' म. फुले गौरवग्रंथ पृ. ४७६* |
| *१२)हेमंत गोरे–* | *बहिणाबाईंची गाणी' सुचित्रा प्रकाशन मुंबई अकरावी आवृत्ती २००७ पृ. ४७* |

१३) डॉ. रा.ग.जाधव – 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९७ पृ.८.

१४) डॉ. अश्विनी धोंगडे – स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन' दिलीपराज प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती १९९३ पृ. ९४

१५) रवींद्र घवी– प्रदक्षिणा (खंड दुसरा) स्वातंत्र्यतोत्तर कविता कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१ पृ. २०

१६) डॉ.मंदा खांडगे– 'कवीच्या गावा जावे' प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २००१ पृ. १६२